शनिवार, ४ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१८७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 04 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-187 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# नाफेडच्या कांदाखरेदीची विधानसभेत पोलखोल

## धनंजय मुंडे : १७ गोण्या कांदा विकून १ रूपया मिळालेल्या शेतकऱ्याची फडकवली पावती



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई दि. ३ मार्च - राज्यभरात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, शेतकरी संकटात सापडला असताना झोपलेले सरकार कांद्याचा प्रश्न पेटल्यानंतर आता नाफेडने खरेदी सुरू केल्याचा बनाव करत आहे. रब्बी हंगामातील रांगडा कांदा खरेदी करण्याची सुरुवात नाफेडने दोनच दिवसापूर्वी केली असल्याचे स्वतःहून जाहीर केले. तसेच केवळ काही शेकड्यात कांदा नाफेडने खरेदी केला, शेतकऱ्यांचा आक्रोश पाहून सरकार बनाव करत आहे, असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार धनंजय मुंडे यांनी विधानसभेत बोलताना केला.**

पणन विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने बोलताना धनंजय मुंडे यांनी राज्यातील कांदा खरेदीची आकडेवारी पुराव्यानिशी सभागृहात मांडली. नाफेडच्या अधिकृत ट्विटर हँडलवरून देखील कांदा खरेदीची आकडेवारी जाहीर करण्यात आली असून, तोही पुरावा धनंजय मुंडे यांनी सादर केला. बीड जिल्ह्यातील कडा येथील शेतकरी नामदेव लटपटे या शेतकऱ्याने दोन दिवसांपूर्वी १७ गोण्या कांदा विकल्यानंतर त्याला १ रुपया मिळाला होता, ती पावतीच धनंजय मुंडे यांनी विधानसभेत दाखवली. सरकारने कांदा प्रश्नी निर्यात धोरण निश्चित करून तसेच भावांतर योजना राबवुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणीही धनंजय मुंडे यांनी यावेळी केली. दरम्यान राज्यात सत्तांतर झाल्यापासून सगळं आलबेल आहे, असं दाखवण्यात येत असले तरी प्रत्यक्षात मात्र तसे नाही, हे पुरवणी मागण्यांवरून दिसून येत आहे, अशी मिश्किल टिप्पणीही धनंजय मुंडे यांनी केली. सुमारे साडेसहा हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांचा अभ्यास केल्यास कळते की, भाजपचे मंत्री असलेल्या विभागांना तब्बल ८७ टक्के निधी देण्यात आलाय, तर मुख्यमंत्री यांच्यासहित शिंदे गटांचे आमदार मंत्री असलेल्या विभागांना केवळ १३ टक्के निधी देण्यात



आलाय. यावरून कोणाच्या मनात काय सुरू असेल याचा अंदाज येतोच, असा टोलाही धनंजय मुंडे यांनी लगावला. यावेळी सत्ताधारी पक्षातील नेत्यांना उद्देशून धनंजय मुंडे यांनी अटलजींची "छोटे मन से कोई बडा नहीं होता और टूटे मन से कोई खडा नहीं होता", या ओळी म्हणत चांगलेच चिमटे काढले. ग्रामविकास विभागाच्या चर्चेत धनंजय मुंडे यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात श्री क्षेत्र भगवानगड, श्री क्षेत्र गहिनीनाथ गड व श्री क्षेत्र नगद नारायणगड या तीनही तीर्थस्थळी मंजूर करण्यात आलेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातुन प्रत्येकी २५ कोटी रुपये निधी मंजूर करण्याची मागणी केली. बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर असलेल्या ५१८ किलोमीटर रस्त्याची कामे रखडली असून आवश्यकतेनुसार त्या कामांची निविदा प्रक्रिया पुन्हा राबवून ती कामे पूर्ण केली जावीत, असेही नमूद केले.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात सध्या विरोधी बाकांवर असलेल्या सदस्यांच्या मतदारसंघात मंजूर केलेल्या ग्रामीण विकासाच्या अनेक कामांचा निधी सरकारने अडवला आहे, राजकारण बाजूला ठेवून एकात्मिक विकासासाठी त्या स्थगित्या रद्द करून सरकारने तो निधी उपलब्ध करून द्यावा, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

याव्यतिरिक्त धनंजय मुंडे यांनी काही विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी ऐन परीक्षेच्या काळात काम बंद आंदोलन केल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले, तसेच त्यांना मानसिक त्रास झाला याची दखल शासनाने घ्यावी व याबाबत मध्यस्थी करावी अशी सूचनाही धनंजय मुंडे यांनी केली.




# दोन महिन्यात तब्बल ३४ वाघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशात जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यात तब्बल ३४ वाघांचा मृत्यू झाला आहे. यात ८ वाघांचा मृत्यू हा महाराष्ट्रात झाला असून ६ वाघ हे एकट्या चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. वाघाचे वाढते मृत्यू चिंतानजक असल्याने यावर तातडीने उपाययोजना होणे गरजेचे झाले आहे. देशात दरवर्षी शेकडो वाघाचा मृत्यू होत आहे. २०२३ च्या दोन महिन्यात तब्बल ३४ वाघांचा मृत्यू झाला आहे. मध्य प्रदेशामध्ये वाघाचे सर्वाधिक मृत्यू झाले असून त्यापाठोपाठ चंद्रपूर जिल्ह्यात वाघाचे सर्वाधिक मृत्यू आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाव्दारे दिलेल्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले आहे. जगात सर्वाधिक वाघ भारतात असून त्यांची संख्या २ हजार ९६७ इतकी आहे. त्यापाठोपाठ रशिया ४३३, इंडोनेशिया ३७१, नेपाल ३५५, थाइलॅंड १४९, मलेशिया १२०, बाग्लादेश १०६, भूटान १०३, चीन ५५, म्यानमार २२ वाघ आहे.वाघ हा अन्नसाखळीतील अतिशय महत्वाचा प्राणी आहे. त्यांचे योग्य संरक्षण व संवर्धन व्हावे यासाठी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या नियमानुसार वनविभाग योजना आखतात. मात्र, वाघाचे मृत्यू थांबविण्यात अद्यापही वनविभागाला यश आले नाही. २०१२ पासून वाघाच्या मृत्यूसंख्येत वाढ झाली आहे. देशात २०१२ मध्ये ८८ वाघांचा मृत्यू झाला. २०१३ मध्ये ६८, २०१४ मध्ये ७८, २०१५ मध्ये ८२, २०१६ मध्ये १२१, २०१७ मध्ये ११७, २०१८ मध्ये १०१, २०१९ मध्ये ९६, २०२० मध्ये १०६, २०२१ मध्ये १२७, २०२२ मध्ये १२१ तर २०२३ मधील जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिण्यांत ३४ वाघांचा मृत्यू झाला आहे. वाघाचे मृत्यूचे कारण हे विषबाधा, विद्युत धक्क्याने मृत्यू, वाघाची शिकार, वाघाची आपसी लढाई असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वाघाचे वाढते मृत्यू रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करून वाघाचे मृत्यू रोखण्याचे मोठे आव्हान वनविभागासमोर आहे.



विदर्भात ७ महिन्यात १६ वाघांचा मृत्यू झाला ही नॅशनल टायगर कन्सर्व्हेशन अर्थॉरिटीची आकडेवारी असून यामध्ये ९ वाघांचा नैसर्गिक मृत्यू तर ४ वाघ वीजेच्या प्रवाहाने आणि काहींची शिकारही झाली आहे त्यामुळे राजकीय पटलावर आम्ही खरे वाघ हे दाखवणाऱ्यांनी वाघांचे संरक्षण करण्यासाठीही लक्ष द्यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे सभागृहात केली.

# लाल मिरचीने मोंढ्याला आणले अच्छे दिन

## धर्माबाद : एक दशकानंतर मोंढा मिरचीने बहारला

आधुनिक केसरी न्यूज


बाबुराव गोणारकर


धर्माबाद : कृषी बाजार समितीच्या मोंढ्यात येणाऱ्या प्रमुख पिकापैकी एक लाल मिरचीचे पीक होते. मात्र गेल्या दहा वर्षांपासून परिसरातील शेतकऱ्यांनी या पीकाकडे पाठ फिरविली होती.मात्र पुन्हा एकदा धर्माबादचा मोंढा पुन्हा एकदा लाल मिरचीच्या मार्केटने गजबजला असून मागील वीस दिवसात चार हजार क्विंटल मिरचीची आवक झाल्याची माहिती बाजार समितीचे सचिव सी. डी.पाटील यांनी दिली.

यंदा लाल मिरचीला सात हजारापासून ते सवीस हजारापर्यंत प्रति क्विंटल भाव मिळत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात आवक सुरु असून दररोज जवळपास शंभर ते दीडशे क्विंटल मिरची मार्केमध्ये येत आहे असे त्यांनी सांगितले. धर्माबाद कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोंढ्यात एकेकाळी लाल मिरची, भुईमूगच्या शेंगा, सूर्यफूल, धना, करडी, लाल - काळे उडीद यांची मोठ्या प्रमाणात आवक होत होती. मिरची तर जिल्ह्यातील सर्वात मोठे मार्केट धर्माबादचे होते. मिरची मार्केटचे धर्माबाद अशीही ओळख धर्माबादची होती. लाल मिरचीच्या व्यापारात अनेक जण मालामाल झाले तर काही जणांचे हालहाल झाले होते. देगाव, दहागाव, मचकल, तरोडा, येळवत, लाब्दी, तानूर यासह तेलंगणातील अनेक गावातून मिरची मोठ्या आवक होत होती. मात्र काळाच्या ओघात शेतकऱ्यांनी मिरची ऐवजी अन्य पिकाकडे वळले होते.परिणामी मागील एक दशकापासून मोंढ्यात मिरची गायब झाली होती. मात्र पुन्हा एकदा मोंढ्यात मिरची आल्यामुळे अडत व्यापारी, हमाल, मिरच्या सोलणाऱ्या महिला यांच्यामध्ये आनंदाची भावना आहे. मिरचीला यंदा चांगला भाव असल्यामुळे शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान बाजार समितीचे सहसचिव वैभव कुलकर्णी यांनी केले आहे.



धर्माबादच्या मोंढ्यातून मिरची हलवल्यानंतर मिरची कांडपच्या माध्यमातून मिरची पावडरमुळे नव्या व्यापारला चालना मिळाली व शहराला नवी ओळख मिळाली. लोकांना रोजगार मिळाला होता. हैद्राबादपासून ते नांदेड जिल्ह्यातील हजारो लोक मिरची खरेदी करण्यासाठी धर्माबाद शहरात येत होते .यात सर्वात जास्त संख्या तेलंगणाची होती .मात्र काही व्यापाऱ्यांनी तेलंगणातच आपला व्यापार थाटल्यामुळे ही संख्या घटली आहे.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




# माती भिडली आभाळा

आधुनिक केसरी

त्यात भगवान विष्णूंनी मोहिनीरूप धारण करून देवांना अमृत आणि दानवांना सुरा म्हणजे मदिरा वाटप केली. हे राहू आणि केतूच्या लक्षात आले. राहू अमृत प्राशन करण्यासाठी आपले रूप बदलून देवांमध्ये जाऊन बसला.

श्री विष्णूंच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी आपल्या सुदर्शन चक्राच्या साहाय्याने राहुचा शिरच्छेद केला. त्याचे शीर उडून ज्या ठिकाणी पडले त्या गावाला राहुरी असे नाव प्राप्त झाले तर त्याचा देह म्हणजे काया ज्या ठिकाणी पडली, ते कायगाव म्हणून प्रसिद्ध झाले अशी दंतकथा आहे. तात्पर्य हे इतके पवित्र ठिकाण आहे. इथे एकदा श्री विष्णूंनी अमृत वाटप केले. दुसऱ्यांदा ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या रूपात साऱ्या जगाला अमृत प्रदान केले. ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी सारस्वताचे सौभाग्यलेणे. काव्य आणि तत्वज्ञान यांचा सुरेख संगम. यानंतर त्याठिकाणी अमृतासमान अनुभव देणारा अमृतानुभव हा ग्रंथ ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिला. ज्या प्रवरा नदीच्या काठावर हे तीर्थक्षेत्र वसले आहे, त्या प्रेवरेला ' अमृतवाहिनी ' असे संबोधले जाते. येथून जवळच गोदावरी आणि प्रवरेचा संगम आहे. या संगमावर देवगड हे पवित्र स्थान आहे. जवळच शनी शिंगणापूर आहे. असा हा रम्य आणि पवित्र परिसर. या पवित्र, शांत आणि रम्य स्थळी खरोखरच वेळ काढून जायलाच हवं.



## आनंदी पहाट

# सौंदर्याचा आत्मिक आनंद मिळणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या दैनंदिन जीवनात देखील आपण नेहमीच सौंदर्याला पाधान्य देत असतो. ते मिळवण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्नशील असतो. या सौंदर्याची व्याख्या करणं शक्य असलं, तरीही त्याची प्रचिती प्रत्येकाला स्वतंत्ररित्या येत असते. व्यक्ति तितक्या प्रकृती, त्यामुळेच प्रत्येकाला सौंदर्याची प्रचिती निरनिराळ्या प्रकारे येत असते. सौंदर्याचा शोध कधी संपतच नसतो. आपल्या घराच्या सजावटीत तर अगदी मुख्य प्रवेशद्वारापासून प्रत्येक वस्तूंमध्ये, कामामध्ये आपण घेतलेला सौंदर्याचा शोध प्रदर्शित झाला पाहिजे. या सौंदर्याच्या प्रचीतीमुळेच आपल्या घराचं अंतर्गत संरचनेचं काम हटके होऊ शकतं. मोर फक्त भरून आलेल्या ढगांसाठी नाचत नाही. त्याप्रमाणे कलावंत केवळ मैफिलीसाठी फुलत नाही. ह्या दोन्हीतील सौदर्य जाणणारा एक तिसरा साक्षीदार असावा लागतो. एक सावध जाणकार हवा असतो. अंतर्गत संरचना आणि सजावट करताना उपयुक्तता, सौदर्य ह्या दोन्ही बाबींना अधिक महत्व असतं. या दोन्हींचा मिलाफ झाल्यामुळेच आपल्या घराचं अंतर्गत सजावटीचं काम पूर्णत्वास जाऊ शकतं. आपल्या शारीरिक गरजा भागवण्यासाठी उपयुक्तता आणि मानसिक आनंद देण्यासाठी सौदर्य महत्वाचं असतं, हे आपण समजून घेतलं पाहिजे. आपण केवळ शारीरिक गरज म्हणून गृहसजावट या विषयाकडे बघत असतो, पण मानसिक, आंतरिक आणि आत्मिक आनंद मिळवण्यासाठी निराळा विचार किंवा प्रयत्न करतोच, असं नाही. सौंदर्याचा आत्मिक आनंद मिळवण्यासाठी आपल्याला कल्पकतेच्या माध्यमातून आणि सौंदर्यदृष्टीच्या सहाय्यानं अंतर्गत संरचना साकारण्याची जरूरी असते. यावेळी आपल्याला गरज असते आपल्या सजगतेची, वैचारिक प्रगल्भतेची, नाविन्याची, सौंदर्यदृष्टीची, कल्पकतेची, नवलाईची. ह्या सर्व बाबींच्या माध्यमातून आपल्याला अपेक्षित आनंद मिळवणं शक्य होऊ शकतं.



आधुनिक केसरी

**भेटतो श्रीरंग | संतांसंगे ||**
कुणाची संगत | करावी कळेना ||
स्वार्थाची भावना | ठायी ठायी ||१||
माया रोडावली | प्रेमही आटले ||
मोहाचे दाटले | जाळे जगी ||२||
झाली संबंधाची | बोळवण वांझ ||
एकांती ही सांज | रडे देवा ||३||
आता तरी धावा | ऐक जगन्नाथा ||
टेकविण्या माथा | शोधु कोठे ? ||४||
मौनाच्या गाभारी | हुंकारला नाद ||
अभंगाची साद | संत घाली ||५||
आत्ममग्न होता | लाभे तुझा संग ||
भेटतो श्रीरंग | संतांसंगे ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

सुधाधारां मनोधीराम् भक्तानां हृदये स्थिराम् ।
सुहास्याऽस्यां सुनेत्रां त्वाम् क्षुदण्डसमन्विताम्
।। अमृताची धारा, मनाची धीरता, भक्तांच्या हृदयात स्थिर असणाऱ्या, सुहास्यवदना, सुंदर नयन असणाऱ्या, उसाचा दंड जवळ असणाऱ्या अशा देवीला तुला मी वंदन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

ऋषि मुनि और योगीश्वर, जंगल
गुहा निवास । तिन कहँ नाच नचाइया,
सूक्ष्माभ्यन्तर वास ।।१७१।। मोटी माया
बहु तजैं, सूक्ष्म तजैं कोइ सन्त । ताहि कृपा
जेहि जीव पर, तब छोड़े सोइ तन्त ।।१७२।।
(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)

०६/०६/१७१,१७२ मूळ भाष्याचा मराठी **अनुवाद :** ऋषि, मुनी तथा योगीश्वर, जे जंगल, गुहा, पर्वत आदि ठिकाणी तपस्यारत असतात, त्यांनाही ही आंतरिक माया नाचवते अर्थात आपल्या जाळ्यात ओढून तपभ्रष्ट करते. स्थूल माया म्हणजे घर, परिवार, धन तसेच संपत्तीचा त्याग तर बरेच जण करतात, परंतु सूक्ष्म, आंतरिक मायेचा त्याग कोणी कोणी संतच करतात. परमेश्वराची आणि सद्‌गुरूंची कृपा ज्या जीवा वर होते, तोच या सूक्ष्म मायेचा त्याग करू शकतो.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

तर आळशी दुराग्रह, स्वभावातील वरचढपणा,समोरच्या चा सतत अपमर्द करणे हे सर्व टाकून दिले पाहिजे. वाईटाचा त्याग व सत्कर्माची कास सतत धरून परमात्म्याला जे जे प्रिय आहे ते ते सतत केले पाहिजे तरचं हा संसाररूपी भवसागर आपणं आनंदाने पार करू ही तर सयर्थाची शिकवण आहे. ती सदासर्वकाळ ध्यानात ठेवून सतत सत्कर्माची फुलझाडे लावत जीवनातील आनंद मिळवू.
इति दासबोधे गुरूशिष्य संवादे श्रवणनिरूपणनाम समास आठवा समाप्त.

# भक्त आणि परमात्मा एकरूपच असतात

आधुनिक केसरी

आमच्या हातून वारंवार चुका होतात' असे तुम्ही म्हणता. लहान मुलगा चालताना अडखळतो, पडतो किंवा बोलताना बोबडे बोलतो त्याचे आईबापांना कौतुकच वाटते. त्याचप्रमाणे तुमच्या चुकांचे मला कौतुक वाटते. चुका सावरण्याच्या तुमच्या प्रयत्नांचेही तसेच कौतुक वाटते. म्हणून त्याबद्दल तुम्ही काहीही मनात आणण्याचे कारण नाही. गुरूने एकदा सांगितले की, 'तुझे मागचे सर्व गेले, पुढे मात्र वाईट वागू नकोस' तर शिष्याने ते श्रद्धेने खरे मानावे. आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे परिमार्जन नामच करू शकते. भगवंताचे नाम हे सर्व रोगांवर रामबाण औषधच आहे. नामाचे हे औषध सतत थेंब थेंब पोटात गेले पाहिजे. ऑफिसमध्येसुद्धा ते आपण बरोबर घेऊन जावे. विद्वान्, अडाणी, श्रीमंत, गरीब सर्वांना हे औषध सारखेच आहे. जो पथ्य सांभाळून हे औषध घेईल त्याला गुण लवकर येईल. एखादा मुलगा 'मी विहिरीत उडी घेणार' म्हणून हट्ट धरून बसला तर बापाने त्याचा हा हट्ट पुरवायचा का त्याला समजावून किंवा



तोंडात मारून तिथून बाजूला काढायचे ? त्याप्रमाणे तुमचे विषय मागण्याचे हट्ट आहेत. खरा भक्त कधीही दुःखी-कष्टी असत नाही, आपल्या समाधानात असतो; मग तो कितीही दरिद्री किंवा व्याधिग्रस्त असेना ! अमुक एक हवे ते मिळाले नाही म्हणजे सामान्य माणसाला दुःख होते. भक्ताला कसलीही आस नसते, त्यामुळे त्याला दुःख नसते. तो आणि परमात्मा एकरूपच असतात. परमात्म्याची इच्छा हीच त्याची इच्छा असते. सगुणाची भक्ती करता करता त्याला 'मी' चा विसर पडत जातो. 'मी नसून तूच आहेस' ही भावना दृढ होत जाते. शेवटी 'मी' नाहीसा झाला की राम, कृष्ण, वगैरेही नाहीसे होतात आणि परमात्मा तेवढा शिल्लक उरतो. आजारामधून उठलेल्या अशक्त माणसाने जसे काठीच्या आधाराने चालावे, त्याप्रमाणे प्रांपचिकाने सगुणभक्तीने तरून जावे. देहबुद्धी असणाऱ्या माणसाला सगुणावाचून भक्तीच करता येणार नाही. भगवंताला आपण सांगावे की, 'भगवंता, तुझी कृपा मजवर असू दे; आणि कृपा म्हणजे, तुझे स्मरण मला अखंड राहू दे.' यातूनच त्याची भक्ती उत्पन्न होईल. भगवंतावाचून कशातही समाधान नाही. त्याच्याशिवाय जगण्यात आनंद नाही. जो भगवंताचा झाला, म्हणजे त्याच्या नामात राहिला, त्याला जगण्याचा कंटाळा येणार नाही. आजचे बोधवचन आहे - परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावे. श्रीराम समर्थ

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती ॥ झळझळीत भिंती
। वृंदावनें तुळसीचीं ॥४॥ तुका म्हणे देवा । अवघा निरविला हेवा
॥ कुटुंबाची सेवा । तो चि करी आमुच्या ॥५॥ पराविया नारी
माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥१॥ न करितां परनिंदा
द्रव्य अभिलाष । काय तुमचें यास वेचे सांगा ॥ध्रु.॥
बैसलिये ठायी म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥२॥
संताचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥३॥
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ॥४॥
तुका म्हणे देव जोडे याचसाटीं । आणीक ते आटी न लगे कांहीं ॥५॥
शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥१॥
मुखीं अमृताची वाणी । देह वेचावा कारणीं ॥ध्रु.॥
सर्वांगीं निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥२॥
तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ॥३॥
चित्त समाधानें । तरी विष वाटे सोनें ॥१॥
बहु खोटा अतिशय । जाणां भले सांगों काय ॥ध्रु.॥

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ४ मार्च २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari







# गांजा तस्करी; लोहमार्ग पोलिस कर्मचाऱ्यासह दोघे अटक

## हिंगोलीत ३८ किलो वाळलेल्या गांज्यासह १४ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक जी.श्रीधर व जिल्ह्याच्या अप्पर जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती अर्चना पाटील यांनी विशेष मोहिमे अंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढुन कार्यवाही करण्याच्या सुचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक पंडीत कच्छवे यांना दिल्या होत्या त्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवसांब घेवारे यांच्या नेतृत्वात एक विशेष पथक नेमण्यात आले होते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशा वरुन काल गुरुवार दि.०२ मार्च २०२३ रोजी विशेष पोलीस पथक माहिती काढत असतांना गोपनिय माहिती मिळाली की परभणी जिल्ह्यातून एका कार मध्ये अवैधरित्या गांजाची वाहतुक होत असुन ती कार औंढा ( नागनाथ ) येथील विश्रामगृहा समोर औंढा ते परभणी जाणारे रोडवर उभी आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्या नंतर पोलीस पथकाने योग्यती कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करुन सायं.०५-०० वाजेच्या सुमारास औंढा नागनाथ येथील विश्रामगृहा समोर उभ्या असलेल्या एका पांढऱ्या रंगाची कार क्र. एमएच १२ केएन २१६० वर छापा मारला असता सदर कार मध्ये कार चालकासह अन्य दोघे आरोपी नामे रविंद्र अमरसिंग राठोड वय ३४ वर्ष व्यवसाय नौकरी ( लोहमार्ग पोलिस ) रा.कृष्णा ता.जि.वाशिम व शेख मोईनोद्दीन शेख वय ३६ वर्ष व्यवसाय मजुरी रा.भिमवाडा पुर्णा ता. पुर्णा जि. परभणी हे मिळुन आले असुन त्यांच्याकडील तीन बॅग मध्ये खाकी रंगाच्या चिकट टेपणे कागदाचे अवरणाला गुंडाळलेले एकुण १४ लहाण मोठे वेगवेगळ्या वजनाचे गांजाचे गठ्ठे ज्याचे एकुण वनज ३८ किलो ६०० ग्रॅम वजन किं.अं. ९,६५,०००/- व गुन्हयात वापरलेली कार असा एकुण १४,६५,००० /- रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त केला असुन सदर प्रकरणात सपोनि शिवसांब घेवारे स्थागुशा हिंगोली यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पोस्टे औंढा नागनाथ येथे गुरनं. ४६ / २०२३ कलम ८ (क), २० (ब) (क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. अलीकडील काळात वाळलेला गांजा पकडलेली हि सर्वात मोठी कार्यवाही असून असल्याचे हिंगोली जिल्हा पोलिस दलाकडून समजते. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री जी. श्रीधर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना



पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. श्री पंडीत कच्छवे, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार संभाजी लकुळे, गजानन पोकळे, ज्ञानेश्वर पायघन, गणेश लेकुळे, चालक तुषार ठाकरे, प्रशांत वाघमारे, रविकांत हरकाळ, गजानन गिरी, पंजाब थिट्टे यांनी केली आहे.

# उंबरझरा संस्थानात विश्वतांकडूनच ४३ लाखांचा अपहार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** घाटंजी तालुक्यातील उंबरझरा (झंझाळा) येथे प्रसिद्ध श्री नृसिंह सरस्वती संस्थान आहे. या संस्थानचे कामकाज पाहणाऱ्या महाराजांच्या वृद्धत्वाचा फायदा घेत मंदिराच्या विश्वतांनीच मंदिराची मालमत्ता लुटल्याचा प्रकार घडला आहे. सात लोकांनी संगनमताने तब्बल ४३ लाख रूपयांचा अपहार केल्याची तक्रार घाटंजी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यावरून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीधर बवीराम जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी प्रमोद देशपांडे (६०), प्राची देशपांडे (५६), ओमप्रकाश महाजन (३७), ओजस्वी महाजन (३४), सर्व रा. चंडिकानगर, नागपूर, अभय चरडे (३८, रा. कारंजा घाडगे), पूजा महाजन (३४), सुधीर खरडे (३६), रा. नागपूर यांच्याविरूद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. उंबरझरा (झंझाळा) येथील दत्तमंदिर, हनुमान मंदिर व आश्रमामध्ये श्रीराम महाराज वास्तव्यास आहे. त्यांचे वय आजमितिस ८५ वर्षे आहे. त्यामुळे श्रीराम महाराज यांच्यामार्फत या ट्रस्टचा कारभार वरील सात जण बघत होते.

# हजरत मस्तान शहावली उर्सानिमित्त नामवंत शायर, कवींचा मुशायरा

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** पुर्णेतील ग्राम दैवत म्हणून ओळखल्या हजरतं मस्तान शहावली यांच्या सार्वजनिक उर्सा निमित्त शनिवार 04 मार्च 2023 रोजी भव्य मुशायरा ( कवी संमेलन ) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात नामवंत कवी तथा, शायराना आमंत्रित करण्यात आले आहे या मुशायरा कार्यक्रमाचे आयोजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचे पाथरी येथील युवा नेते सईद खान तथा माजी उपनगराध्यक्ष हाजी कुरेशी यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

पूर्णा शहरात हजरत मस्तान शाह वली सार्वजनिक उर्स सुरू आहे या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे येत्या चार मार्च शनिवार रोजी रात्री आठ वाजता जामा मस्जीदी समोर मुशायरा ( हास्य कविसंमेलन ) होणार आहे या मध्ये नामवंत कवी,शायर अब्रारार कासीफ निजामत, जोहर कानपूरीं,हाशीम फेरोजाबादी, अल्ताफ जिया, नयूम फराज, टीपीकल जगत्याली,मनोज मद्रासी,आर्कीफ शुजा ,चांदणी शबनम,सोहेल आझाद,रमेश गिरी,शायर साबेर भाई,वाजीद मीर्जा सह आदी प्रसिद्ध कवी तथा शायर येणार आहे.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून पाथरी येथील शिवसेनाचे युवा नेते सईद खान,पूर्णा नगरीचे माजी उपनगरध्यक्ष हाजी कुरेशी,मा ख सुरेश जाधव,जिल्हा प्रमुख विशाल कदम,संतोष एकलारे, वसमत चे माजी नगराध्यक्ष अब्दुल हाफिज,जिल्हाध्यक्ष माधव कदम,भाजपाचे हनुमान अग्रवाल,रवीभैय्या जैस्वाल, विशाल किरडे,उर्स कमेटी अध्यक्ष मुजीब पठाण,माजी नगरसेवक मगदूम कुरेशी, अखिल काजी,बाबा पठाण, इलियास चाऊस प्रकाश काबळे ,सोहल पठाण, शामसूंदर गायकवाड, नागेश एगडे, हिरा गवली, संजय शिंदे, उत्तम आहिरे,चंद्रकांत मोरें, शेख इलियस शेख इस्राईल,स मतीन, हशमी, मुजमिल खान पाशा खान आदी मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमास जास्ती जास्त नागरिकानी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावे असे आव्हान या मुशायरा कार्यक्रमाचे संयोजक जम्मू भाई ,वाजीद कुरेशी आदींनी केले आहे.

# बँक ऑफ इंडियामध्ये होणार मेगा भरती

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांमध्ये बँकिंग क्षेत्राकडे तरुणाईचा कल वळला असल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक तरुण-तरुणी या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी मेहनत घेत आहेत. या बॅंकिंगमध्ये सध्या नोकऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. पदवी-पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बँकेमध्ये काम करायचा विचार करत असाल तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे.




बॅंक ऑफ इंडिया या बँकेद्वारे JMGS-I प्रोबेशनरी ऑफिसर्सची भरती होणार आहे. या भरतीसाठीच्या परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली आहे. मिळालेल्या सूचनेनुसार, १९ मार्च २०२३ रोजी ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा घेतली जाणार आहे. इच्छुक उमेदवार परीक्षेसंबंधित सविस्तर माहिती बँकेच्या bankofindia.co.in या अधिकृत वेबसाइटवरुन मिळवू शकतात. अ१ मार्च २०२३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या बॅंक ऑफ इंडियाच्या सूचनापत्रकामध्ये, उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेची माहिती देण्यात आली आहे. त्यात Junior Management Grade Scale – I ऑफिसर्सच्या घेतली जाणारी भरती परीक्षा देण्यासाठी इच्छुक उमेदवाराने बँकिंग अँड फायनान्स या विषयामध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे असे म्हटले आहे. तसेच ही परीक्षा १९ मार्च रोजी होणार असल्याचेही त्यात नमूद करण्यात आले आहे.यासाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करणे आवश्यक आहे. वेबसाइटवर जाऊन उमेदवार अर्ज करु शकतात. अर्ज केलेल्या उमेदवारांना लवकरच परीक्षेसाठीचे ॲडमिट कार्ड्स (परीक्षेसाठीचे ओळखपत्र) दिले जाणार आहे. हे कार्ड बॅंकेच्या वेबसाइटवर उपलब्ध होतील. बॅंक ऑफ इंडियामधील JMGS-I प्रोबेशनरी ऑफिसर्सच्या ५०० रिक्त पदांसाठी ही भरती होणार आहे. तसेच परीक्षेसंबंधित सूचनापत्रक वेबसाइटवरुन मिळवू शकता.

## धंगेकरांचा सूचक इशारा

आधुनिक केसरी

कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत विजय मिळवून भाजपाला पराभवाचा धक्का देणारे काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांनी विजयानंतर सूचक प्रतिक्रिया दिली आहे. धंगेकरांनी तब्बल ११ हजाराहून अधिक मतांनी विजय मिळवला आहे. गेल्या २८ वर्षांपासून हा मतदारसंघ भाजपाकडे होते. मात्र, आता पुन्हा एकदा या मतदारसंघात काँग्रेसचा आमदार झाल्यामुळे या निकालावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर विजयी उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी टीव्ही ९ शी बोलताना निवडणूक काळात गैरप्रकार करणाऱ्यांना अद्दल घडवण्याबाबत सूचक विधान केले आहे. कसबा पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या रवींद्र धंगेकरांनी भाजपाच्या हेमंत रासनेंचा पराभव केला. मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर रिकाम्या झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत टिळक कुटुंबातीलच एका व्यक्तीला आमदारकीचे तिकिट दिले जावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. टिळक कुटुंबीयांकडूनही तशी इच्छा व्यक्त केली गेली. मात्र, भाजपाकडून माजी नगरसेवक हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आल्यामुळे या मतदारसंघात भाजपाविरोधात नाराजी असल्याचे सांगितले गेले. याचाच फटका भाजपाला बसल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, मतदानाच्या आधी भाजपाकडून पैसे वाटप केल्याचा आरोप रवींद्र धंगेकरांनी केला होता. त्याचा निषेध म्हणून त्यांनी आंदोलनही केले होते. आता विजयी झाल्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी सूचक प्रतिक्रिया देत गैरप्रकार करणाऱ्यांना अद्दल घडवण्याचे संकेत दिले आहेत. "मी ज्या दिवशी फॉर्म भरला, त्याच दिवशी सांगितले की माझा विजय नक्की आहे. करोडोंचा पाऊस पाडल्यानंतरही जनतेने ते पैसे स्वीकारले नाहीत. शेवटी पैसा हरला आणि कार्यकर्ता जिंकला. जनशक्ती जिंकली आणि धनशक्ती हरली. माझ्या अनेक निवडणुका धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशा झाल्या आहेत, असे रवींद्र धंगेकर म्हणाले.

## वारिस पंजाब दे

आधुनिक केसरी



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

**नुकताच पंजाबमधील अजनाना पोलीस स्थानकावर वारीस पंजाब दे या संघटनेच्या समर्थकांनी जे स्वतःला खलिस्तान समर्थक म्हणवतात त्यांनी हल्ला केला. त्यात सहा पोलीस शिपाई जखमी झाले. पंजाब मध्ये पुन्हा एकदा खलिस्थानी चळवळ फोफावेल की काय अशा पद्धतीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. वारिस पंजाब दे ही अभिनेता दीप सिद्धू यानी स्थापन केलेली संघटना आहे. हा तोच दीप सिद्धू आहे ज्यानी 26 जानेवारीला दिल्ली येथे शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने उपद्रवी लोकांना घेऊन दिल्लीच्या लाल किल्ल्यावर हल्ला केला होता.**

पुढे हा दीप सिद्धू एका कार अपघातात मरण पावला .त्यानंतर त्याची जागा अमृतपाल सिंग नावाच्या एका व्यक्तीने घेतलेली आहे. हा अमृतपाल सिंग दुबई येथे ट्रान्सपोर्टचा व्यापार करीत होता. दुबई वरून परत आल्यानंतर त्याने वारिस पंजाब दे या संघटनेचे मुख्य पद स्वीकारले. आता तो खलिस्तान राज्याची पुन्हा मागणी करीत आहे.हा अमृतपाल स्वतःला भारतीय सुद्धा मानत नाही.

तो म्हणतो माझ्याजवळ पासपोर्ट भारतीय आहे म्हणून मी भारतीय आहे असे नाही. तो म्हणतो की पंजाब हे भारताचे अविभाज्य अंग नाही.अशा या अमृतपाल सिंग याच्या जवळचा साथीदार तुफान सिंह याला पोलिसांनी एका अपहरणाच्या केसमध्ये अटक केलेली होती .त्याला सोडावे यासाठी वारिस पंजाब दे या संघटनेच्या खलिस्तानी कार्यकर्त्यांनी पोलीस स्थानकावर हल्ला केला. स्वतः अमृतपाल सिंग पोलीस स्टेशनवर गुरु ग्रंथ साहिब असलेली पालखी घेऊन गेला होता. पालखीच्या आड त्याचे हजार समर्थक तेथे जमले व त्यांनी पोलीस स्थानकावर हल्ला केला.तेथील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये म्हणून तुफान सिंह याला दुसऱ्या दिवशी सोडून देण्यात आले .लोक आता अमृतपाल सिंह कडे भिंद्रांवाले भाग दोन म्हणून पहात आहेत. असे झाले तर पंजाब पुन्हा एकदा अशांत होऊ शकतो. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान म्हणाले की जे लोक गुरु ग्रंथ साहिब ची आड घेऊन पोलीस स्थानकावर हल्ला करतात ते लोक पंजाब आणि पंजाबीयत याला समजू शकत नाही व ते पंजाबचे वारीस सुद्धा होऊ शकत नाही. एकेकाळी पंजाब मध्ये जरनेल सिंग भिंद्रांवाले याचा कहर होता. तो सुवर्ण मंदिरात घुसून बसलेला होता व तेथून आपल्या अतिरेकी कारवाया चालवत होता. शेवटी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांना लष्कराला सुवर्ण मंदिरात घुसविणे भाग पडले. व सैन्याने सुवर्ण मंदिराच्या आत जाऊन या भिंद्रांवाले च्या समर्थकांचा व भिंद्रांवाले चा खात्मा केला. या घटनेला आता बराच काळ लोटलेला आहे. खलिस्तानाची मागणी आता शांत झालेली आहे असे वाटते. परंतु मधून मधून काही स्टेजवरून खलिस्तान समर्थनाच्या घोषणा दिल्या जातात. 1947 साली ज्यावेळेला पाकिस्तान निर्माण झाले त्याच वेळेला जर मुसलमानांसाठी पाकिस्तान सारखे राष्ट्र निर्माण होऊ शकते तर शीखांसाठी खलिस्तान हे राष्ट्र निर्माण का होऊ शकत नाही अशा पद्धतीचा सूर खलिस्तान समर्थकांचा होता. पाकिस्तानने त्याही वेळेला या खलिस्तान समर्थकांना आपला पाठिंबा जाहीर केला होता .ज्यावेळेस भिंद्रांवाले सुवर्ण मंदिरात लपून बसलेला होता त्याही वेळेला पाकिस्तान भारतावर आक्रमण करेल व तुम्ही सुद्धा भारतामध्ये अंतर्गत युद्ध सुरू करा अशा पद्धतीचा प्लॅन आयएसआय व भिंद्रांवाले याचा होता. आता सुद्धा जे खलिस्तान समर्थक पाकिस्तानात बसलेले आहेत त्यांना पाकिस्तान सातत्याने पैसा पूरवित असतो. दर दोन-चार दिवसाआड पाकिस्तानातून उडवलेले ड्रोन पंजाब प्रांतामध्ये ठिकठिकाणी पकडले जात असतात. कॅनडा ही खलिस्तान समर्थकांची दुसरी भूमी आहे. कॅनडातून सुद्धा खलिस्तानचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणावर केला जातो. इतरही काही देशांमध्ये या खलिस्तानचे समर्थक बसलेले आहेत. जे भारतामध्ये खलिस्तानवादी शक्तींना पैसा पूरवित असतात. भारतात शिखांवर कसे अत्याचार करण्यात येतात अशा पद्धतीच्या जाहिराती कॅनडा, युके, जर्मनी, पाकिस्तान इत्यादी देशांमध्ये दाखविल्या जातात. ज्या जाहिराती विशेषतः शीख समाजाच्या तरुणांना ज्यांचे वय वीस ते पंचवीस वर्षे आहे यांना केंद्रित करून दाखविल्या जातात. त्यामुळे तरुणांचे डोके फिरविण्यासाठी याचा उपयोग केला जातो. व या जाहिरातींच्या माध्यमातून करोडो रुपयांचे फंडिंग गोळा केले जाते. या जाहिरातींवर ज्या कॉमेंट्स असतात त्या विशेषतः पाकिस्तानातील पंजाब प्रांतातून केल्या गेलेल्या आहेत. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या म्हणण्यानुसार ज्या हजार लोकांच्या बोलण्याला काहीही अर्थ नाही. यांचा उद्देश पंजाबला अस्थिर करणे आहे. परंतु पंजाब अस्थिर होणार नाही असे त्यांनी म्हटले आहे. परंतु चिंतेची गोष्ट ही आहे की सर्व काही व्यवस्थित सुरू असताना, देश प्रगतीपथावर जात असताना अशा प्रकारचे अलगाववादी आंदोलन एखाद्या प्रांतात तयार होणे की ज्या आंदोलनाला विदेशी राष्ट्रांमध्ये बसलेल्या लोकांचा सुद्धा पाठिंबा आहे. ही चिंतेची बाब आहे. काश्मीरमधील ब्राह्मणांना तेथील नवाबाने मुसलमान होण्यास फर्मावले होते. तेव्हा ते म्हणाले होते की आमचे राजे गुरुतेग बहादूर आहेत. आम्ही त्यांच्याशी बोलून तुम्हाला सांगतो. ज्यावेळेस गुरुतेग बहादरांना हे समजले की या लोकांवर धर्मांतरण करण्यासाठी दबाव आणला जात आहे त्यावेळेस ते म्हणाले की तुम्ही नवाबाला सांगा की गुरुतेग बहादूर जर मुसलमान बनणार असतील तर आम्हीही मुसलमान बनू.म्हणून गुरुतेग बहादूरांनी लहानग्या गुरुगोविंद सिंहास विचारले की धर्मासाठी बलिदान करण्यासाठी सगळ्यात चांगला मनुष्य कोण आहे. त्यावेळेस गुरू गोविंद सिंह आपल्या वडिलांना म्हणाले की धर्मासाठी बलिदान करण्यासाठी तुमच्यापेक्षा योग्य व्यक्ती कोणीही नाही. आणि त्यानंतर गुरुतेग बहादुरांनी आपले बलिदान दिलेले आहे. त्यामुळे पंजाब हा गुरुतेग बहादुर यांचा आहे. गुरुगोविंद सिंहाचा आहे, बंदा बैरागींचा आहे, धर्मासाठी बालपणीच मृत्यूला कवटाळणाऱ्या फतेह सिंह, जोरावर सिंह यांचा आहे, भारताच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या शेकडो शीख सैनिकांचा आहे. अशा पंजाबचे वारीस म्हणजे वंशज खलिस्थानवादी, फुटीरवादी होऊ शकत नाही. पंजाबचे वंशज सिख गुरुना मानणारे भारतीय सैन्यामध्ये पराक्रम गाजविणारे व भारताच्या प्रगतीत आपला वाटा देणारे लोकच होऊ शकतात तेच खरे वारीस पंजाब दे आहेत.



## महागाईशी लढा आणखी किती काळ ?

आधुनिक केसरी




डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**गेल्या काही दिवसांपासून देशात महागाई वाढत आहे. वाढत्या महागाई मुळे देशांतील सामान्य जनता होरपळून निघत आहे. आर्थिक घडामोडींमध्ये वाढ झाली असली तरी, महागाईचा सततचा उच्च दर हा अर्थव्यवस्थेसाठी चिंतेचा विषय आहे. केंद्र सरकार महागाईच्या आघाडीवर सपशेल फेल ठरल्याचे चित्र आहे. महागाईने होरपळणाऱ्या जनेतला कुठलाच दिलासा मिळत नसल्याचे त्यांच्यात प्रचंड रोष आहे. आज नाही तर उद्या महागाई कमी होईल, महागाई कमी होण्याचे स्वप्न सर्व सामान्य जनता बघत असतानाच पुन्हा एकदा सरकारने वाहागाई वाढवून जनतेचा रोष ओढवून घेतला आहे.**

आता कंपन्यांनी घरगुती गॅसच्या किंमतीत पुन्हा वाढ केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जोरदार झटका बसला आहे. पेट्रोल-डिझेलचे भाव अगोदरच गगनाला भिडलेले आहेत. त्यात जीएसटीमुळे दैनंदिन वापरातील वस्तूंचे भावही वाढले आहेत. खाद्यतेलाबाबतच तो काय थोडाफार दिलासा मिळत आहे. बाकी सर्वच वस्तूंच्या किंमती दोन वर्षांत झपाट्याने वाढल्या आहेत. एलपीजी सिलेंडरच्या किंमतीत ५० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तर व्यावसायिक सिलेंडरच्या किंमतीत ३५० रुपयांची वाढ झाली. एप्रिल २०२१ पासून आतापर्यंत गॅस सिलेंडरच्या किंमतीत २८४ रुपयांची वाढ झालेली आहे. एप्रिल २०२१ मध्ये गॅस सिलेंडर ८०९ रुपयांत विक्री होत होते. त्यानंतर आतापर्यंत यामध्ये ९ वेळा दरवाढ करण्यात आली आहे. वर्ष २०२१ मध्ये गॅस सिलेंडरच्या किंमतीत २०५.५ रुपयांची वाढ झाली. तर २०२२ मध्ये १५३.५ रुपयांनी किंमती वाढल्या. यावर्षात, २०२३ मध्ये पहिल्यांदा एलपीजी सिलेंडरच्या किंमती ५० रुपयांनी वाढल्या आहेत

जानेवारी महिन्यातील महागाईचे आकडे जाहीर झाले असून नवीन वर्षातही सर्वसामान्यांना महागाईतून दिलासा मिळालेला नाही. जनतेला सतत महागाईचे चटके बसत आहे. सांख्यिकी मंत्रालयाने सोमवारी ग्राहक किंमत निर्देशांकाची आकडेवारी जाहीर केली ज्यात किरकोळ महागाईचा दर जानेवारीमध्ये तीन महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला आहे. आकडेवारीनुसार, किरकोळ महागाईचा दर जानेवारीमध्ये ६.५२ टक्क्यांवर पोहोचला आहे. डिसेंबरमध्ये महागाईचा दर ५.७२ टक्के होता, तर नोव्हेंबरमध्ये हा आकडा ५.८८ टक्के होता. डिसेंबरमधील ४.१९ टक्क्यांच्या तुलनेत जानेवारीत खाद्यपदार्थांची चलनवाढ ५.९४




टक्क्यांवर गेली आहे. यापूर्वी ऑक्टोबर महिन्यात किरकोळ महागाईचा दर ६.७७ टक्क्यांवर होता. चलनविषयक धोरणाचा विचार करताना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया प्रामुख्याने किरकोळ महागाईकडे लक्ष देते. अन्नधान्याच्या महागाईत अजूनही अपेक्षित सुधारणा झालेली नसून अन्नधान्याच्या किमती वाढतच आहेत. अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी झाल्या आहेत. तसेच रब्बी पेरणी चांगली असतानाही जानेवारीमध्ये अन्नधान्य चलनवाढीचा विपरीत परिणाम दिसून आला. कांदा, बटाटा, टोमॅटो वगळता भाजीपाल्याचे दर घसरण्याची गती मंदावली आहे, तर धान्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे.आकडेवारीनुसार, शहरी भागातील महागाई ६ टक्क्यांवर पोहोचली आहे, तर डिसेंबरमध्ये हा दर ५.३९ टक्के होता. त्याच वेळी ग्रामीण भागातील महागाई डिसेंबरमध्ये ६.०५ टक्क्यांवर होती. तर जानेवारीमध्ये ती ६.८५ वर आली आहे. ग्रामीण भागातील ११८१ आणि शहरी भागातील १११४ मार्केटमधून ही आकडेवारी गोळा करण्यात आली आहे. भारतातील महागाई दर कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी आरबीआय रेपो दरात सातत्याने वाढ करत आहे. तसेच अनेक बँकांनी ठेवींवर अधिक व्याज देण्याची घोषणा केली आहे. आयएमएफने नुकत्याच जारी केलेल्या अहवालानुसार, चालू आर्थिक वर्षात भारताची महागाई ६.८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत खाली येऊ शकते. मात्र आजचे आकडे महागाई वाढण्याचे संकेत देत आहेत. वर्ष २०२४ मध्ये महागाई ४ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता असल्याचे मानले जात आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# महागाई विरोधात युवासेनेने रस्त्यावर मांडली चूल!

## गॅस सिलेंडरवरून पुन्हा चुलीवर आणले, हे आहेत अच्छे दिन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** केंद्रातील मोदी सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात ५० रुपये व व्यवसायिक गॅस सिलेंडरच्या दरात ३५० रुपये अशी प्रचंड दरवाढ केली आहे. याच्या निषेधार्थ धुळे जिल्हा युवासेनेच्या वतीने जिल्ह्यातील महाराणा प्रताप ह्या मध्यवर्ती चौकात मोदी सरकार विरोधात निदर्शने देत आंदोलन करण्यात आले, यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी चुलीवर स्वयंपाक करत गॅस सिलेंडर दरवाढीचा प्रखर निषेध करण्यात आला. मोदी सरकारच्या विरोधात "गॅस सिलेंडरचे दरवाढ करणाऱ्या मोदी सरकारचा निषेध असो, अब की बार पाकिटमार सरकार, भाग गई रे भाग गई स्मृती ईरानी भाग गई, चौकीदार चोर है अदानी का यार है, गॅस दरवाढ करून अदानीची नुकसान भरपाई करणाऱ्या मोदी सरकारचा निषेध असो, दरवाढ कमी झालेच पाहिजे" अशा घोषणाबाजी अशा घोषणाबाजी संपूर्ण युवा सेना तर्फे करण्यात आल्या. यावेळी शिवसेनेच्या महिला संघटिका डॉ.जयश्रीताई वानखेडे म्हणाल्या की, केंद्रातील मोदी सरकारने आधीच प्रचंड महागाईने मेटाकुटीला आलेल्या जनतेला आज एक जबरदस्त झटका दिला. घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात ५० रुपये व व्यवसायिक गॅस सिलेंडरच्या दरात ३५० रुपये अशी प्रचंड दरवाढ करुन देशातील जनतेच्या खिश्यावर दरोडा टाकला आहे. आपल्या उद्योगपती अदानी आणि इतरांचे लाखो कोटी कर्जे माफ करून त्यांची वसूली गॅस, पेट्रोल, डीझेल, महागाई करून देशातील जनतेकडुन वसुल करत आहे. तसेच उद्योगपती अदानीचे झालेल्या नुकसानीचे भरपाई दरवाढ करून करत आहेत. जनतेला पुन्हा चुलीकडे वळण्याची वेळ या मोदी सरकारने आणली आहे. म्हणून आज रोजी गॅस सिलेंडर दरवाढीविरोधात, महागाई विरोधात, जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी, भाजपा आणि लपून बसलेल्या स्मृती ईरानी यांनी काँग्रेसच्या काळात केलेल्या आंदोलनाची आठवण करुण देण्यासाठी, गॅस सिलेंडरचे दरवाढ मागे घेण्यात यावी या मागणीसाठी चुलीवर स्वयंपाक करून निषेधार्थ निदर्शने आंदोलन केले. मोदी सरकार हाय हाय, भाग गई रे भाग गई, स्मृती इराणी भाग गई.., मोदी सरकार की तानाशाही नही चलेगी, नही चलेगी, अशा घोषणा देत स्मृती इराणी यांच्या नावाने युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिमगा केला. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या संघटिका जयश्रीताई वानखेडे युवासेना जिल्हाप्रमुख हरीष माळी, उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, अमित खंडेलवाल, योगेश मराठे, जीत पाटील, चेतन धामेचा, सिद्धेश नाशिककर, मनिष माळी, सोमेश कानकाटे, जयेश फुलपगारे, शुभम फुलपगारे, सुमित चौधरी, तुषार सातपुते, उज्ज्वल कोठावदे, सुजय गुळवे, प्रितम लोखंडे, बंटी पाटील, किशोर साळुंखे, महेश वाघ, स्वप्निल चित्ते, अमीन शेख, मयूर माळी, समर्थ मुर्तडक, दादू मराठे, समीर वाघ, निशांत फुलपगारे आदी शिवसेना युवासेना पदाधिकारी व युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नक्षलग्रस्त भागात झाडे, विद्युत खांबांना दिशादर्शक

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** रस्ते अपघात कमी व्हावे, वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, प्रवास सोईस्कर व्हावा याकरिता चिचगड पोलिसांनी कम्युनिटी पोलीसिंगच्या माध्यमातून नक्षलग्रस्त भागात स्तुत्य उपक्रम राबविला. धोकादायक वळणावरील झाडे, विद्युत खांबांना दिशादर्शक (रिफ्लेक्टर) लावले. या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.
गोंदिया जिल्हा पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर, देवरीचे उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या संकल्पनेतून कम्युनिटी पोलिसींग सुरू करण्यात आले आहे. या माध्यमातून अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थी, नागरिकांच्या हिताकरिता विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पोलीस निरीक्षक शरद पाटील यांच्या नेतृत्वाखाली चिचगड पोलिसांनी दिशादर्शक लावण्याचा उपक्रम हाती घेतला. दरम्यान, रस्ता अपघाताचे प्रमाण कमी



करणे, वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे याकरिता पोलिसांनी गुरुवारी नक्षलग्रस्त भागातील धोकादायक व अतिधोकादायक रस्ते, वळण, रस्त्यालगतची धोकादायक झाडे यांना वेगवेगळ्या प्रकारचे व रंगाचे दिशादर्शक लावले. चिचगड ते पिपरखारी तसेच चिचगड, बोरगाव / बाजार, परसोडी रस्त्यावरील धोकादायक अशा १८५ झाडांना व १२५ विद्युत खांबांना दिशादर्शक बसविण्यात आले आहे.

## सोनिया गांधींची प्रकृती बिघडली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दिल्लीतल्या सर गंगाराम रूग्णालयात सोनिया गांधी यांना दाखल करण्यात आले आहे. सोनिया गांधी यांना ताप आल्याने रूग्णालयात दाखल केले गेले आहे. चेस्ट मेडिसिनचे डॉक्टर अरूप बसू आणि त्यांची टीम सोनिया गांधींवर उपचार करते आहे. काही चाचण्याही करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सोनिया गांधी यांची प्रकृती स्थिर आहे अशीही माहिती समोर आली आहे. मेडिकल बुलेटीनमध्ये डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार सोनिया गांधी यांना ताप आल्याने त्यांना सर गंगाराम रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती आता स्थिर आहे. सोनिया गांधी यांना २ मार्चला या रूग्णालयात दाखल करण्यात आले. डॉ. अरूप बसू आणि



त्यांची टीम सोनिया गांधी यांच्यावर उपचार करते आहे. सोनिया गांधी या सध्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेत आहेत. याआधी जानेवारी महिन्यात सोनिया गांधी यांना व्हायरल इनफेक्शन झाले होते ज्यानंतर त्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. ही घटना घडल्यानंतर भारत जोडो यात्रेत असलेले राहुल गांधी हे यात्रा सोडून आई सोनिया गांधी यांना भेटण्यासाठी गेले होते. जानेवारी महिन्यात सोनिया गांधी यांना सुमारे एक आठवडा रूग्णालयात रहावे लागले होते त्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. आता पुन्हा एकदा ताप आल्याने सोनिया गांधी यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# ४ मार्च : जोखीमपूर्ण कार्याचा गौरवदिन



डॉ. मोहन दिवटे, लातूर
संपर्क क्र. 9860440900

आधुनिक केसरी

**४ मार्चचा दिवस. केंद्र शासनाने वीज कामगारांना दिलेली एक गौरवाची भेट. अत्यंत जिकरीचे आणि कधी-कधी स्वतःचा जीव धोक्यात घालून लोकांच्या अंधारल्या घरात विजेचा दिवा दीपवणारा विदयुत लाईनमन आजपर्यंत ३६५ पैकी एकाही दिवसाच्या खिजगणतीत नव्हता. परंतु, केंद्र शासनाने या वर्षापासून पहिल्यांदाच प्रकाशदुतांच्या कार्याची दखल घेऊन विदयुत लाईनमन वर्गासाठी ४ मार्च हा दिवस 'लाईनमन डे' म्हणून जाहीर केला. त्याबदल तमाम लाईनमन बिरादरीतर्फे शासनाचे आणि राज्यात हा दिवस उत्साहात साजरा करीत असल्याबदल महावितरणचेही आभार....**

शिक्षक, पत्रकार, डॉक्टर, शेतकरी, कामगार, वकील, अभियंता, नर्स आणि इतर बऱ्याच



व्यावसायिकांच्या सेवाकार्यांचा गौरव म्हणून वेगवेगळे दिवस अगदी सन्मानाने पाळण्याची आणि साजरे करण्याची आपली परपंरा आहे. शासन स्तरावरुनही त्यांचा योग्य सन्मान केला जातो. व्यावसायिकांच्या सेवाकार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करुन त्यांचे आत्मबल वाढविणे हाच त्यामागचा हेतु असतो.

वास्तविकपणे विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या जनमित्र तथा लाईनमनचे काम अत्यंत जोखमीचे आणि कधी-कधी जीवावर बेतणारे असेच असते. वीज पुरवठयाची अखंडित आणि सुरळीत सेवा बजावतांना त्यांना अनेक आव्हानांना तोंड दयावे लागते. ऊन, वारा-थंडी व पावसासारख्या नैसर्गिक परिस्थितीसह काही प्रसंगी मानवनिर्मित संकटांचाही सामना करावा लागतो. संकटे कशीही आणि कुठलीही असोत, अखंडित वीज पुरवठा करणे त्याची जबाबदारी आहे. तसे विजेच्या क्षेत्रात चुकीला माफी नसते. इथं चुकला तो संपला, हाच एकमेव परिणाम असतो. तशा अधिकाधिक चुका दुर्दैवाने लाईनमनच्या वाटयाला आलेल्या पाहायला मिळतात. एका ताज्या अहवालानुसार देशभरात वर्षाला सुमारे ११ हजार तर प्रतिदिन ३० जणांचे विद्युत अपघातात मृत्यू होतात. इतके हे क्षेत्र जोखमीचे आहे. विजेची सेवा जोखमीची असली तरी ती अत्यंत महत्त्वाची आहे. लाईनमनच्या सेवेचे मोल मोजण्यासाठी कुठलेच गणक उपलब्ध नाही. इतका हा घटक महत्त्वाचा असूनही तो आजपर्यंत दुर्लक्षितच राहिला गेला. इतर सामान्य-असामान्य परिस्थितीसह कोव्हीड-१९ काळात तर त्याची नको तितकी अग्नीपरीक्षा झाली. कोव्हीड काळात त्याने फ्रंटलाईन वॉरियर म्हणून काम केले. त्याने केलेल्या अखंडित आणि सुरळीत वीज पुरवठयाच्या कामामुळेच कोरोना महामारीला नियंत्रणात आणण्यासाठी इतर यंत्रणा प्रभावीपणे काम करू शकल्या. दुर्दैवाने फ्रंटलाईन वॉरियर म्हणून काम करूनही इतर सेवा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांप्रमाणे होणारा गौरव लाईनमनच्या पदरी पडलाच नाही. केवळ कोव्हीड काळातच नव्हेतर अलीकडच्या काळातील काही संदर्भांनुसार महाराष्ट्रात निसर्ग आणि तौक्ते चक्री वादळानेही थैमान घातले. त्यात राज्यात महावितरण या विदयुत यंत्रणेचे मोठे नुकसान झाले. बऱ्याच भागातली विद्युत यंत्रणा उध्दवस्त झाली. अनेक ठिकाणी लाईनमन कर्मचाऱ्यांनी अंगा खांदयावरुन विदयुत खांबाची वाहतूक करुन विस्कटलेली यंत्रणा अल्पावधीत पूर्ववतही केली. हे अख्ख्या देशाने पाहिले. कुठेही आणि कधीही खंडित झालेला वीज पुरवठा केवळ यंत्रणा काम करते म्हणूनच पूर्ववत होत असतो, हे



आता लोकांच्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही. चक्रीवादळ आणि कोव्हीड काळातील लाईनमनच्या कामाची दखल घेवून महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्यासह त्यांच्या संचालक मंडळाने जिगरबाज कर्मचाऱ्यांच्या पाठीवर वेळोवेळी शाबासकीची थाप मारून त्यांचे आत्मबलही वाढविले आहे. विद्युत वितरण क्षेत्रातील पायाभूत यंत्रणेचा विचार केला तर राज्यातच नव्हे तर देशात महावितरणची यंत्रणा सर्वाधिक मोठी आहे. राज्यात ३.०८ लाख वर्ग किलो मीटर्स इतक्या भौगोलिक क्षेत्रात विद्युत यंत्रणेचे जाळे उभारलेले आहे. त्यात ४५७ शहरे आणि ४१९२८ गावांचा समावेश आहे. अर्थात, राज्यात विजेची यंत्रणा सर्वत्र पोहोचली आहे. सुमारे तीन कोटी ग्राहक महावितरणची वीज वापरतात. महावितरणच्या या जाळयात भूमिगत आणि उपरी पध्दतीच्या उच्च व लघुदाबाच्या ११.३१ लाख सर्किट किलो मीटरच्या वीज वाहिन्या आहेत. त्यात वितरण रोहित्रांची संख्या ८ लाख २२ हजार इतकी आहे. ४०९४ वीज उपकेंद्र आणि स्विचींग सेंटर्स आहेत. या साऱ्या विद्युत जाळयाच्या मुळाशी लाईनमन वर्गाचे अपार कष्ट आहेत. मागच्या एकदोन दशकापर्यंत यंत्रणा उभारणीचे काम पूर्वीच्या मंडळ आणि आताच्या कंपनीचेच लाईनमन करीत होते. त्यांनी केलेले काम आणि उभारलेले खांब आजही जसेच्या तसे ताठ मानेने उभे आहेत.

जुन्यातला एकही खांब डान्सींग मोडमध्ये दिसत नाही. जुने काही खांब मोडून गेले पण, ते कुठेही वाकलेले किंवा झुकलेले दिसत नाहीत. महावितरणच्या लाईनमननी इतके कष्ट त्यात ओतलेले आहेत. आजच्या 'लाईनमन डे' निमित्त हाच त्यांच्या कामाचा गौरव समजायला हरकत नाही. पूर्वी काही काळापर्यंत केवळ विदयुत यंत्रणा उभी करणे आणि लोकांना विजेचा पुरवठा करण्याला प्राधान्य होते. आता ते दिवस बदलले आहेत. वितरण कंपन्या केवळ ग्राहकांना विद्युत पुरवठा करतात. त्यासाठी त्यांना सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील वीजनिर्मिती कंपन्यांकडून वीज विकत घ्यावी लागते. खरेदी केलेल्या विजेच्या वहनापोटी पारेषण भाडेही दयावे लागते. अर्थात, महावितरणचे आर्थिक दायित्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अलीकडच्या काळात विद्युत क्षेत्रातील कामाच्या स्वरुपात मोठे बदल होताना दिसतात. आता विद्युतसेवा पुरविण्यासोबतच सेवेच्या मोबदल्यात महसुलासाठीच्या कामालाही प्राधान्य दयावे लागते. विजेच्या वाणिज्यिक व्यवहारानुसार ग्राहकांनी वापरलेल्या प्रत्येक युनिटचा परतावा वसूल झालाच पाहिजे. तसा दंडक वीज नियामक आयोगाने घालून दिलेला आहे. त्यामुळे वीजबिल वसूलीच्या कामाचीही जबाबदारी लाईनमनवर येऊन पडणे स्वाभाविकच. वीजबिलाच्या वसुलीचा विषय आला की या ना त्या कारणाने पहिल्यांदा लाईनमन वर्गाला ग्राहकांच्या रोषाला बळी पडावे लागते. वास्तविकपणे विजेच्या व्यवहारातील गणिती समिकरणे लक्षात घेऊन वीजग्राहकांनी आता वीज कर्मचाऱ्यांना समजून घेण्याची गरज वाढली आहे. लाईनमनच्या कामाचे महत्त्व आणि त्यांच्या कामातील जोखीम ओळखून महावितरणतर्फे पूर्वीपासूनच अनेक उपाय योजनांची अमलबजावणी केलेली आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा साधनांचा पुरवठा आणि प्रशिक्षणावर प्राधान्याने भर दिलेला आहे. आजच्या लाईनमन गौरव दिनीसुध्दा त्यांच्यात स्व-सुरक्षा आणि ग्राहक सेवेची भावना अधिक वाढीस लागावी. त्यांच्याविषयीही समाजात अधिकचा आदरभाव वाढीस लागावा, अशी अपेक्षा आणि शुभेच्छाही.

# मतासाठी पैशाचा वापर : लोकशाहीची हत्या



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी


**भारत हा सर्वात मोठी लोकशाही अजून जनतेच्या मताला अनन्यसाधारण महत्व लोकशाही मध्ये आहे. निवडणुकीद्वारे जनता आपला प्रतिनिधी निवडत असते. हाच प्रतिनिधी जनतेची कामे करून सर्वांगीण विकासावर भर देण्यात येतो. निवडणूक प्रक्रिया ही पुर्ण निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात असते. देशातील कोणतीही निवडणूक ही पारदर्शक व निर्भिड व्हायला पाहिजे याची सर्व जबाबदारी निवडणूक आयोगाची असते. मागील काही वर्षापासून देशातील सत्ता बदलली व अनेक बदल झाले.**

ते बदल म्हणजे ज्या काही स्वायत्त संस्था होत्या त्यांनी स्वतः ची विश्वास अहर्ता गमावून सरकारच्या इशाऱ्यावर काम करायला सुरवात केली असा आवाज जनतेचा आहे. मग त्यामधून निवडणूक आयोग कसे सुटणार ? निवडणूक आयोगाने अनेक निर्णय वा कृत्य सरकारच्या बाजुने केले असून लोकांचा विश्वास कमी करून घेतला आहे. आता आपण कसबा पोटनिवडणुकीचेच बघितले तर मतासाठी पैसे वाटणाऱ्यांचे अनेक व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. मतासाठी पैसे वाटून मत मिळवून घेणे म्हणजे लोकशाहीची हत्या करणे होय. निवडणुकीत पैशाचा वापर करून मत विकली जातात आणि व्हिडीओ व्हायरल होऊनही जर कारवाई होत नसेल तर लोकशाही ची हत्या करण्यामध्ये निवडणूक आयोगही आरोपी म्हणुनच कृत्य करतो ही बाब सिद्ध होते. निवडणूक ही विकासकामे, शिक्षण, रोजगार, आरोग्य या विषयावर लढवली जात असते. परंतु केंद्रात आणि राज्यात ही एकाच पक्षाचे सरकार असुन त्याच पक्षातील उमेदवाराला विकास शिक्षण रोजगार आरोग्य यासाठी मतच मिळू नाही. म्हणजे केंद्रात आणि राज्यात सरकार असुनही संविधानीक मार्गाने एक उमेदवार निवडून आणण्याची क्षमता पक्षात नसेल आणि मत मिळावे म्हणून लोकांना रोजगार शिक्षण आरोग्य महागाई या मुद्यांवर लोकांसमोर जाण्याची लायकी नसलेले लोक असंविधानीक मार्गाचा वापर करून लोकांना पैशाचे आमिश दाखवून मतादाराची दिशाभुल करून लोकशाही ची हत्या खुले आम होताना दिसत आहे. मतासाठी पैशाचा वापर करणारे लोक खरचं जनतेच्या फायद्यासाठी निवडणूक लढवित असतील का ? जर मतासाठी उमेदवार लाखों रुपये खर्च करत असेल तर तो करोडो रुपये राजकारणामधुन कमवत नसेल हे कशावरून. आणि राजकारणात निवडून आल्यावर पैसाच खाता येत नसेल तर निवडणुकी अगोदर पैसे वाटणारा पागल आहे का ? एवढा पैसा वाटून लोकशाही ची हत्या केली जाते निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन केले जात नाही अपेक्षित निवडणूक प्रक्रिया पार पडत नसेल तर लोकशाही जिवंत आहे हे म्हणणे योग्य आहे ? राष्ट्रीय नेत्याच्या कार्यक्रमात खुर्च्या रिकाम्या असताना त्या पक्षाचे उमेदवार निवडून येत असतील तर निवडणूक प्रक्रीयेसह इतर काही ठिकाणी काळा बाजार चालत नाही असे म्हणणे म्हणजे स्वताच्या बौद्धीक पातळीचे प्रदर्शन करण्यासारखे आहे. ईव्हीएम च्या माध्यमातून लोकांच्या मताची किंमत तर शुन्य




केली आहे. परंतु लोकांच्या मताचा लिलाव हजार पाचशे रुपयाला होत असेल तर लोकशाही अस्तित्वात आहे असे म्हणणे आणि लोकशाही मधुन लोकांचा विकास झाला असे म्हणणे चुकीचे ठरेल. ज्या देशात मतदार हा राजा असतो आणि या राजाला निवडणुकीत मत देण्यासाठी हजार पाचशे रुपये देऊन त्याचे मत पाच वर्षासाठी विकत घेतले जात असेल तर देशाचा विकास किती झाला असेल ? मुळात मतदार हजार पाचशे रुपये का घेतात ? याचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे मतदाराला स्वतः च्या मताची जाणीवच नाही. जाणीव नसल्याने त्याला एकआ मताची किंमत कळालीच नाही. एक मत सरकार पाडू शकते ही वस्तुस्थिती त्याला कळालीच नाही. जर मतदारांना मताची किंमत कळाली असती तर कोणत्याही नेत्याची पक्षाची मताची बोली लावायची हिम्मतच झाली नसती. आणि लोकशाहीमध्ये लोकप्रतीनीधी यांनी लोकांचे काम प्रामाणिक पणे केले असते तर पैशाने मत वळवण्याची लाजरीवाणे काम करण्याची गरज पडली नसती. जे कोणी लोकप्रतीनीधी झाले त्यांनी इमानदारीने काम केले असते सत्तर वर्षानंतरही समस्या ची तिव्रता जाणवली नसती. लोकशाही मध्ये लोकांचे सरकार असते. परंतु येथे लोकशाही ला डावलून पक्षाचे व पैसाचे सरकार बनत असताना स्वायत्त संस्थांना स्वतंत्र पणे काम करू दिले जात तेथे जनतेच्या समस्या वर खरच लक्ष देऊन सोडविण्याचा प्रयत्न करेल ? आजही लोकांना लोकप्रतीनीधी फक्त निवडणुकीच्या वेळी ओझरता दिसतो. बाकी पाच वर्षे तो चमत्कारिक पद्धतीने गायब झालेला असतो. संपर्क कार्यालयामध्ये बेरोजगार चार पाच लोक बसलेले असतात. लोकप्रतीनीधी नी लोकांमध्ये जाऊन लोकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवायच्या असतात तर लोकच लोकप्रतिनिधी च्या कार्यालयाच्या चकरा मारून मारुन परेशान होतात. सत्तर वर्षामध्ये सरकारने सरकार गरीबी दुर करू शकले नाही पण विकासापासून गरीबांना दूर करण्याचा प्रयत्न मात्र केला गेला. जर समाजामध्ये उच्च दर्जाचे शिक्षण, उच्च उत्पन्न असलेले रोजगार व इतर मुलभूत सुविधा जरी निर्माण झाल्या असत्या तर कोणत्याही व्यक्तीच्या मनात हजार पाचशे रुपये घेऊन लाचारी करण्याची भावनाच निर्माण झाली नसती. आज कित्येक लोकांना एका वेळच्या जेवणाची सोय नाही, उमेदवार आपले प्रश्न सोडवतील अशी अपेक्षा नाही आणि सर्वात महत्वाचे म्हणजे उमेदवार निवडून आला की त्याने काम करो की न करो तो मात्र स्वतः चेच घर भरतो हे लोकांना पक्के माहिती आहे. म्हणून लोकही आपल्या मताची किंमत माहिती नसल्याने हजार पाचशेवर संतुष्ट होतात. हजार पाचशेमध्ये मताची किंमत घेणारा लाचार समाज आणि हजार पाचशे रुपये देऊन निवडणूक येणारा लाचाराचा नेता दोघांची परिस्थिती सारखीच. हा हजार पाचशे घेऊन समाजाचे तोंड बंद करते. पक्ष याला बजेट मधले काही देऊन याचे तोंड बंद करते याचा खर्च झालेला पैसा वरून कमाई होते म्हणून कधीच समाजाच्या, शेतकरी विद्यार्थी शेतमजूर यांच्या समस्या हा पटलावार मांडत नाही. सामाजिक मुद्देच चर्चेसाठी घेत नसल्याने आणि चर्चेसाठी मुद्दे आवश्यक असल्याने धार्मिक व भावनिक मुद्दे उपस्थित करून त्यावर चर्चा केली जाते. लोकांचे प्रश्न लोकांचे हित, लोकांच्या समस्या, पाणी, रस्ते, आरोग्य सुविधा, रोजगार शिक्षण फक्त निवडणूक अजेंडा मध्ये बंद असते. पैशाच्या जोरावर निवडणुका होत असताना मात्र निवडणूक आयोग गप्प बसते तेव्हा मात्र देश लोकशाही ची हत्या करून हुकुमशाही कडे जात आहे याची जाणीव होते. बर पैशाच्या जोरावर मत वळवणे, लोकांना पाच पाच वर्षे न भेटने ही बाब आठ नव वर्षातील मुळीच नाही त्याअगोदर ही असेच चालायचे परंतु त्यावेळी तिव्रता थोडी कमी होती आज खुप जास्त झाली आहे बस एवढेच दुसरा काही फरक नाही. पण मुळात लोकशाही मध्ये लोकांना मताची किंमतच जर माहिती नसेल, हजार पाचशे साठी कोणीही मत विकत असेल आणि हजार पाचशे मध्ये जर मत विकल्या जात असेल तर संपूर्ण सत्ता भांडवलदार लोकांकडे जाईल आणि भांडवलदार लोक फक्त नफा बघत असतात. लोकांचे हीत नाही. म्हणून खऱ्या अर्थाने लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर लोकांना त्यांच्या मताची किंमत समजून सांगणे आवश्यक आहे. कोणतीही ताकत कोणाचेही मत विकत घेऊ शकत नाही. आणि तोच एक अधिकारी आहे ज्यामुळे सरकार सत्तेत येऊ शकते आणि सत्तेतून जाऊ शकते. म्हणून नागरिकांना जागृत करणे आवश्यक आहे तरच लोकशाहीचे पुर्नजिवन होईल. लोकशाही चे खऱ्या अर्थाने पुर्नजिवन झाले तर निवडणुकीमधील पैसा हद्दपार होईल व लोकविकासावर सरकार बनले. लोकशाही ची रुजवण करताना स्वाभिमानी समाज निर्माण करणे आवश्यक असते. आणि स्वाभिमानाची कुठेही बोली लागत नसते. नागरिक जागृत व स्वाभीमानी असतील तर सरकारला तर जनकल्याणाचे काम करावेच लागेल परंतु स्वायत्त संस्था प्रामाणिक काम करून लोकशाही ची जोपासना होईल. जोपर्यंत मतापैसाचा वापर होऊन स्वाभिमान व मताचा लिलाव होईल तो पर्यंत लोकशाही अबाधित राहणारच नाही. म्हणून जागृत लोकांनी एकत्र येणे आवश्यक आहे. खुर्ची आज आहे उद्या नाही परंतु खुर्ची मिळण्यासाठी कोणत्याही स्तराला जाऊन नाव इज्जत मानसन्मान नाही मिळाला तरीही चालते पण खुर्ची आणि पैसा मिळाला पाहिजे ही विचारसरणी लोकशाहीवर वार करून तीची हत्या करत आहे. एरवी पाप पुण्याच्या गोष्टी करणाऱ्यांना लोकांच्या टाळुवरचे लोणी खाताना फसवणूक करतांना पाप पुण्य कळत नाही. याचाच अर्थ राजकारणात फक्त एकच धर्म चालतो लोकशाहीची हत्या जरी झाली तरी चालते पण लाचारी करूनही का होईना खुर्ची मिळाली पाहिजे. हे लोकशाही साठी घातक असून या विरोधात मोठा लढा उभा करणे आज काळाची गरज आहे तेव्हा च कुठे आपण लोकशाही ला जिवंत ठेऊ शकतो.

# उजेड पेरायला चाललेल्या निखाऱ्यानो..



नितीन चंदनशिवे
संपर्क क्र. 7020909521

आधुनिक केसरी

**मी सातवीच्या वर्गात असताना माझ्या वर्गात गेल्या सहा वर्षांपासून नापास होणारा एकजण होता. आम्ही त्याला सगळेजण नाना म्हणायचो.आमच्याच गल्लीत राहायला होता. आमच्यापेक्षा वयाने खूप मोठा. मिशासुद्धा चांगल्याच वर आलेल्या होत्या आणि हा नाना अंगाने धिप्पाडच्या धिप्पाड होता. म्हणजे आमचं मास्तर त्याच्या खांद्याला लागायचं. अंगाने पैलवान असणारा गडी.पण अभ्यासात पार दरिंद्री. नानाला काहीच येत नव्हतं.आणि दरवर्षी नाना नापास व्हायचा.  त्यात आमच्या मास्तरने एक नियम असा केला होता, वर्गात विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर जो विद्यार्थी बरोबर देईल त्याने वर्गातल्या सगळ्या पोरांच्या मुस्काडीत मारायची.**

त्यावेळचे मास्तर असा नियम करायचे आणि यात काय व्हायचं त्या भितीने सगळी पोरं मन लावून अभ्यास करायची.पण नानाच्या डोक्यात काहीच राहत नव्हतं.आणि त्याचा परिणाम म्हणजे नाना दररोज न चुकता वर्गातल्या प्रत्येकाचा मार खायचा.आणि पोरं पण नानाला मारताना जोरात रट्टा द्यायची. नाना डोळे गच्च मिटून हाताची घडी घालून उभा राहायचा. पोरांनी कधीच नानावर दया माया दाखवली नाही. मला मात्र नानाची फार कीव यायची.    तरीही नाना दररोज शाळेत न चुकता यायचा.उलट सर्वांच्या आधी नाना वर्गात हजर असायचा.सकाळी आलेला नाना व्यवस्थित दिसायचा.आणि शाळा सुटल्यावरचा नाना म्हणजे दोन्ही गाल लालभडक सुजलेले आणि डोळे पार रडून रडून खोल गेलेले दिसायचे.एक दिवस शाळा सुटल्यावर मी जवळ जाऊन नानाला विचारलं,म्हणलं नाना कशाला शाळेत येतो ?तुला काही येत नाही.रोज पोरं मारतात तुला.तू कुणाला काहीच बोलत नाहीस.मला कळत नाही एवढं सहन करूनसुद्धा तू कधी शाळा चुकवत नाहीस.कशासाठी हे तू करतोस. ?त्यावर नानाने माझ्या डोक्यावर हात ठेवून केसातून हळुवार बोटे फिरवली.माझ्याकडे पाहत त्याने डोळे गच्च मिटले.डोक्यावरचा हात काढून घेतला आणि नाना तसाच पाठमोरा होऊन झपझप पावले टाकत निघून गेला.मी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर उत्तर नानाने दिलं नाही.

रोज शाळा भरत राहिली.आणि रोज नाना न चुकता मार खात राहिला.तोंड सुजवून घेत राहिला. मास्तरने प्रश्न विचारला की आपोआप नाना मनानेच उभा राहायचा अगदी तसाच डोळे गच्च मिटून.आणि मग ज्या पोरानं उत्तर बरोबर दिलेलं असायचं ते उड्या मारत नानाजवळ जायचं आणि खाडकन नानाच्या जोरात मुस्काडीत द्यायचं.पाचही बोटे नानाच्या गालावर जशीच्या तशी उमटायची.आणि मी हे सगळं केविलपणे बघत बसायचो.

आणि एक दिवस घडलं असं,मास्तरने एक प्रश्न विचारला,तो प्रश्न असा होता. "गावाबाहेर बायका जिथं धुणं धुवायला जातात,त्या जागेला काय म्हणतात. ?" आम्ही सगळ्यांनी जमेल तशी उत्तरे दिली, कुणी सांगितलं,ओढा म्हणतात,नदी म्हणतात,वगळ,आड,विहीर,तलाव,तळं, डबकं,पोहरा म्हणतात तर कुणी कुणी खूप डोकं खाजवून काहीही उत्तरे दिली.पण मास्तर उत्तर चुकीचं आहे असंच सांगत होते.नाना शांत बसून सगळीकडे पाहत होता.सगळ्यांची उत्तरे चुकलेली होती.गोंधळ शांत झाला आणि नानाने हात वर केला.जसं नानाने हात वर केला तशी सगळी पोरं एकसाथ मान वळवून नानाकडे बघायला लागली.मास्तर ही नानाकडे एकटक बघतच राहिले.

त्याच शांततेत नाना शांतपणे उभा राहिला. आणि हाताची घडी घालून नानाने मान ताठ करून उत्तर दिलं,

"गुरुजी गावाबाहेर बायका ज्या जागेवर धुणं धुतात त्या जागेला पाणवठा म्हणतात."

आणि एका झटक्यात गुरुजी म्हणाले,नाना लेका तुझं उत्तर बरोबर आहे.मास्तर जसं उत्तर बरोबर आहे म्हणाले तसा नानाने मोठा दीर्घ श्वास घेतला.वर्गातली सगळी पोरं थरथर कापायला लागली.आणि नानाने सगळ्यात आधी वर्गाचं दार लावून दाराची आतली कडी लावली.त्याने कडी लावल्याबरोबर सगळी पोरं मोठ्याने बोंबलायला लागली. मी शांतपणे नानाकडे पाहत होतो. मलाही एक त्याची मुस्काडीत बसणार होतीच. पण मनातून मी खूप आनंदी झालो होतो. नानाचा चेहरा लालबंद झाला होता. डोळे मोठे झाले होते, आणि नाना आता सगळ्या वर्गावर तुटून पडणार होता. मास्तरानीच नियम केलेला असल्यामुळे मास्तर नानाला अडवूच शकत नव्हते.तरीही नानाचा तो राग पाहून मास्तर दबकतच हळूच नानाला म्हणाले,"नाना जाऊ दे सोड लेकरं लहान....." मास्तरचं वाक्य पूर्ण झालंच नाही. त् नानाने अक्षरशः मास्तरला लहान मुलासारखं दोन्ही  हाताने उचलून घेतलं आणि अलगद खुर्चीवर नेऊन ठेवलं.

आणि त्यानंतर गेल्या जवळजवळ सात वर्षाचा तो अन्याय नानाला आठवला.पोरं हात जोडून ओरडत होती. मास्तरला विनवण्या करत होती.पण त्यांचाही नाईलाज होता. आणि नानाने सुरवात केली.एक एक पोरगं कॉलरला धरून नानाने उभं केलं.आणि नानाने असं झोडपून काढायला सुरवात केली की बस्स. एका मुस्काडीत पोरगं खाली आडवं होऊन पडायचं. ते बघून बाकीचे सगळे जोरात बोंबलत होते.नाना पेटलेलाच होता.सगळा वर्ग ओला होताना दिसायला लागला.त्याच्या एका रट्याने पोरं चड्डीत मुतून मुतून बोंबलत होती.काही पोरं ते बघूनच मारायच्या आधीच लघवी करत होती.वर्गातला कालवा वाढतच राहिला. नानाने जितकं आजवर घेतलं होतं ते व्याजासहित परत केलं.     सगळ्यात शेवटी नाना माझ्याजवळ आला. मला त्याची कसलीच भीती वाटत नव्हती.उलट मला



मनातून खूप आनंद झाला होता.नानाने माझी कॉलर धरली.हिसका देऊन मला उभं केलं.मी उभा राहिलो. नानाकडे एकटक पाहत राहिलो.माझ्या चेहऱ्यावरचा तो आनंद त्याने समजून घेतला.नानाने माझी कॉलर ढिली केली.मुस्काडीत मारायला उचललेला हात नानाने अगदी मायेने माझ्या गालावरून फिरवला. त्यावेळी माझ्या मोठ्या भावाची जागा नानाने घेऊन मनात घर केलं. गालावरून हात फिरवून त्याने अगदी तसाच हात माझ्या डोक्यातून फिरवत म्हणाला,

"कळलं का ?मी आजपर्यंत शाळा का बुडवली नाही ते ? कारण मला माहित होतं एक  ना एक दिवस माझं उत्तर बरोबर येईल.आणि त्यादिवशी मी सगळा हिशोब चुकता करून टाकेन."

नानाने त्याचं दप्तर उचललं.कडी काढून त्याने दार उघडलं.आणि नाना वर्गाच्या बाहेर नव्हे नव्हे शाळेच्या बाहेर कायमचा निघून गेला.त्यानंतर नाना शाळेत कधीच दिसला नाही.

यानिमित्ताने मला याठिकाणी नमूद करून सांगावे वाटते पिढ्यांनपिढ्या समाजातल्या एका वर्गाने कायम अन्याय सोसला आहे.सोसत आलेला आहे.पण,आजही मला अशा समाजात असणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांमध्ये हा नाना आजही दिसतो.आणि म्हणूनच मला सांगावं वाटतं, की सहन करत असताना ते जरूर सहन करा.हार मानू नका.लाचार होऊन कुणाच्या ताटाखालचं मांजर होऊ नका.सत्तेसाठी म्हणा किंवा पैशासाठी म्हणा,स्वताला बाजारात विकू नका.अगदी प्रामाणिकपणे आपलं काम न चुकता करत राहा.कारण एक दिवस नक्की येतो.एक काळ असा आयुष्यात नक्की येतो तो फक्त तुमचा असतो. आणि अशा काळात तुम्ही सुद्धा कुणावर दया माया दाखवू नका.

आपल्याला नानाकडून केवळ मुस्काडीत मारणे हे शिकायचे नाही.ते एक गमतीशीर उदाहरण झालं. तुटून पडणे म्हणजे त्याचे वेगळे अनेक प्रकार आहेत.आपल्यातला काहीच न येणारा नाना आधी मारून टाका.आपल्यातला सहन करत जगणारा नाना कसा संपेल याचा विचार करा.येणारा काळ ओळखा.

बाबासाहेबांनी सांगितलं आहेच,शिका, संघटीत व्हा,आणि संघर्ष करा. आम्ही हे फक्त भाषणात बोलतो किंवा ऐकतो,पुस्तकात वाचतो, त्यानुसार आम्ही खरंच त्यापद्धतीने पुढे जात आहोत का ? याचा विचार करा. आम्ही संघटीत होतोय का ?झालो तर आम्ही टिकून राहतोय का ?तसं होत नाहीय म्हणूनच आपला घाव घालण्याचा दिवस उगवत नाहीय. तो उगवण्यासाठी आपल्याला खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून घेणं गरजेचं तर आहेच. परंतु येणाऱ्या या नवीन पिढीला ही चळवळ त्यांच्या हातात देताना आपल्याला फार विचार आणि कृती करून ती द्यावी लागणार आहे. हे चळवळ देणाऱ्या मावळत्या पिढीने आणि हातात चळवळ घेणाऱ्या उगवत्या पिढीने सुद्धा लक्षात घेतलं पाहिजे.

कारण त्याच गावाबाहेरच्या  पाणवठ्याखाली आपल्या पाच हजार वर्षांपूर्वीपासूनच्या खंगत आलेल्या पिढ्या जातीयतेच्या नावाखाली गाढल्या गेलेल्या आहेत.आणि गाढल्या गेलेल्या मानवतेला पुन्हा जिवंत करणाऱ्या महापुरुषांच्या विचारांची ही चळवळ पुन्हा पुन्हा दूषित होऊ देऊ नका.तुमचा घाव घालायचा काळ केव्हाच सुरू झालाय.आधी आपल्यात वाढत चाललेली घाण साफ करा आणि आतातरी उजेड पेरायला सुरवात करा हीच एक विनंती.

# शिक्षणाच्या पाऊलखुणा



एकनाथ आव्हाड
संपर्क ९८२१७७७९६८

आधुनिक केसरी

**अहमदनगर जिल्ह्यातील पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल, शेवगाव येथील सहशिक्षक उमेश घेवरीकर हे एक उपक्रमशील शिक्षक, लेखक, अभिनेता आणि दिग्दर्शक आहेत. वीस वर्षे सातत्याने ते बालनाट्याचे लेखन, दिग्दर्शन आणि राज्यस्तरीय स्पर्धेत सादरीकरण करीत आहेत. ग्रामीण भागातील नाट्यविषयक कार्यासाठी पहिला पं.सत्यदेव दुबे रंगकर्मी पुरस्कार त्यांना लाभलाय.**

त्यांचा नुकताच ग्रंथाली प्रकाशनाकडून ' शिक्षणाच्या कविता ' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. हा कवितासंग्रह इतर कवितासंग्रहापेक्षा अतिशय वेगळा आहे. कारण यातील सर्वच कविता या शिक्षण प्रवाहाशी निगडीत आहेत. शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक, समाज, पुस्तके, आजची शिक्षण प्रकिया या सर्वांकडेच एक संवेदनशील शिक्षक कवी कशापद्धतीने पाहतो; यावरचे कवीचे मनन चिंतन या सर्वच कवितांतून प्रकटते. विद्यार्थी केंद्रभूत मानून त्याच्या भावजीवनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा कवितेच्या अंगाने मांडलेला विचार इथे महत्त्वाचा वाटतो. कवितेतून कवीच्या मनातील शिक्षणविषयक विचार वाचताना ते विचार नकळतपणे आपल्या हृदयापर्यंत  झिरपत जातात ; हे या कवितांचे वैशिष्ट्य आहे. पुस्तकांचे हात हाती घेतल्यावर काय घडते हे सांगताना कवी म्हणतातः

**'होऊन मित्र घडवतात चरित्रआणि  मनाचे,**
**घराचे, समाजाचे नंदनवन होत जाते...'**

पुस्तकांबाबत केवढा मोठा विचार या चिमुकल्या पाच ओळींत सामावलेला आहे. एक चांगले पुस्तक शंभर मित्रांच्या बरोबरीचे असते. पुस्तकांचे महत्त्व विषद करताना एकदा लोकमान्य टिळक म्हणाले होते, 'मी नरकातसुद्धा पुस्तकाचे स्वागत करीन. कारण नरकाचे स्वर्गात रूपांतर करण्याची ताकद पुस्तकांमध्ये आहे. टिळकांच्या या विचारांची आठवण करून देणारी ही चपखल कविता.  'वर्ग नावाची पालखी' या कवितेत...

**'वाट शाळेची चालता मला ती वाटावी पंढरीची '**


असं कवी म्हणतात आणि शाळेतल्या चिमुकल्या लेकरांत विठुमाउली पाहतात. शिकणं आणि शिकवणं हे  केवढं पवित्र कार्य आहे याचं मूर्तिमंत रूपच ही कविता मला वाटते.

ज्योतिबा फुले व सावित्रीमाय फुले यांच्या स्मृती जागवणारी 'हाती असावी पाटी' ही कविता अज्ञानाच्या काळोखाला ज्ञानाचे प्रकाशमान उत्तर देणारी ठरते.

**'हाती असावी पाटी आणि गाणं असावं ओठी**
**हरेक लेकराच्या सावित्रीमाय असावी पाठी**
**तम सरावा संसाराचा उजळावा हरेक उंबरा**
**प्रत्येक झोपडीत**
**पसरावा**
**ज्योतिप्रकाश गहिरा'**

ज्या वयात शाळेची वाट धरावी, पुस्तकांची साथ करावी त्या वयात मुलांना घरच्या अनंत अडचणींमुळे कुटुंबासाठी चार पैसे मिळवण्याकरीता शाळेबाहेर राहून कष्ट करावे लागतात. इच्छा असूनही त्यांना शाळेत यायला जमत नाही. शाळेत त्यांची गैरहजेरी लागते आणि शेवटी पटावरून नाईलाजाने त्यांचे नाव कमी केले जाते. ही मुले शिक्षण प्रवाहाच्या बाहेर फेकली जातात. अशाच मुलांचे प्रातिनिधिक मनोगत 'सतत गैरहजर....नाव कमी' या कवितेतून व्यक्त  होते... कवितेतील शेवटच्या ओळी तर हृदयाचा ठाव घेतात. कवितेतला शालाबाह्य विद्यार्थी म्हणतो,

**' तुमचं बी बरुबरच हाय**
**हवी ती शिक्षा करा**
**शाळेत नाही आलो म्हणून**
**जनावरावानी तुडवा**
**पर समजून घ्या वो**
**पोटच्या पोरावानी**
**राबतानाबी आठवायची**
**तुमचीच कविता अन् गानी**
**हात जोडून विनवतंय पोरगं**
आणि मी मात्र
**लाल शाईने लिहीत होतो**
**सतत गैरहजर...नाव कमी '**





... सरकारी नियमांच्या कात्रीत सापडलेल्या शिक्षकाची अगतिकताच शेवटच्या या चार ओळी सांगून जातात.

असं म्हणतात, शाळांच्या वर्गखोल्यांतून भारताचे भवितव्य घडत असते; प्रत्येक वर्गखोली त्या शिक्षकासाठी  एक प्रयोगशाळाच असते असे. पण हे विधान सार्थ करण्यासाठी त्याला मूर्त स्वरूप देण्यासाठी शिक्षकाच्या वाट्याला अनंत अडचणी येत असतात. 'रोजीरोटीचा सवाल' या कवितेत शिक्षक म्हणतो, 'मुलांना शिकवलेले कळो न कळो मी शिकवतच राहीन. कारण सवाल माझ्या रोजीरोटीचा आहे.' शिकवणे जेवढे महत्त्वाचे तेवढेच शिकणेही .किंबहुना या दोन्ही प्रक्रिया या एकाच नाण्याच्या बाजू. येथे शिक्षक केवळ वक्ता आणि विद्यार्थी केवळ श्रोता असे असून चालत नाहीत. हेच सांगण्याचा प्रयत्न ही कविता करते.

कोरोना काळाने तर शिक्षण व्यवस्थेचेसुद्धा खूप मोठे नुकसान केले आहे. दोन वर्षे मुले शाळेपासून वंचित होती. तेव्हा शाळा मुलांना व्याकूळ होऊन साद घालत होती. मुलांच्या प्रतिसादाची आतूर होऊन वाट पाहत होती. हेच सांगणारी ' मिस यू बाळा ' ही कविता. या कवितेत शाळा म्हणतेः

**'तुमच्याविना सुना सुना**
**धूळ माखला हा फळा**
**जीवापाड लागलेला मला**
**तुमच्या किलबिलाटाचा लळा**
**ऐकण्या तुमची कविता – गाणी**
**प्राण कंठाशी झाले गोळा**
**म्हणते रे शाळा...मिस यू बाळा'**

'अँटीव्हायरस' ही कविता वाचताना अंगावर एकदम काटा येतो. ही कविता शाळा, शिक्षण यांचा पुन्हा नव्याने विचार करायला लावते. आताच्या काळात शाळांचा काहींनी बिझनेस करून टाकला आहे. चकचकीत शाळा,भरमसाठ फी...एज्यकेशनल मॉलच हे उभे जणू.

या ' अँटीव्हायरस' कवितेत कवी म्हणतातः

**'झाडाच्या खोडालाच**
**फळा टांगून**
**पाखरांची शीळ ऐकत**
**गार झुळूक अंगावर घेत**
**बाईंनी शिकवलेली**
**पाखरांची कविता**
**केव्हाच गुदमरून गेलीय**
**एसीच्या जोरदार तडाख्याने '**

... या ओळी वाचून आपण अंतर्मुख होतो. अशाच प्रकारे शिक्षण प्रक्रियेतील अनेक कंगोरे या कवितांतून कळत नकळत उलगडत जातात.

शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विषयांवर जाणीवपूर्वक लेखन करता करता उमेश घेवरीकर यांनी 'शिक्षणाच्या कविता' लिहून शिक्षण प्रक्रियेकडे आपल्याला गांभीर्याने पाहायला लावले आहे. या पुस्तकातील कविता वाचताना या कवितांतील आशय कधी आपल्याला आतून हलवून सोडतो तर कधी हादरवून टाकतो. या पुस्तकाला ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. तर ज्येष्ठ लेखक नरेंद्र लांजेवार यांनी या पुस्तकाची पाठराखण केली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार संतोष घोंगडे यांचे मुखपृष्ठ अतिशय समर्पक ,बोलके आणि पुस्तकाच्या शीर्षकाला अधिक सार्थ ठरणारे आहे.

एकूणच अनेकानेक शिक्षकांच्या शिक्षणाविषयीच्या भावभावनांचे खऱ्या अर्थाने  हे पुस्तक प्रतिनिधित्व करते.  शिक्षण हे साधन आहे; साध्य नाही हे सांगून उत्तम माणूस त्यातून घडावा हेच शिक्षणाचे खरे ध्येय असावे हीच गोष्ट प्रभावीपणे आणि प्रकर्षाने पुढे आणते, हेच या पुस्तकाचे खरे यश होय.

**पुस्तकाचे नाव : शिक्षणाच्या कविता**
**कवी : उमेश घेवरीकर**
**मुखपृष्ठ : संतोष घोंगडे**
**प्रकाशक : ग्रंथाली प्रकाशन**
**पृष्ठे : ४४ , किंमत : ८०/– रूपये**



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

# पण यांना वेसण कोण घालणार ?

आधुनिक केसरी

**समर्थांनी शिवाजी महाराजांना उपदेश करत असताना काही मार्गदर्शनपर विचार सुचविले जे दैनंदिन जीवनात सर्वसामान्यांना देखील लागू पडतात. बुद्धिवंतांनी प्राप्त परिस्थितीनुरूप त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. पुण्याजवळ आळंदीरोड लगत जुने तारकेश्वरीचे मंदिर आहे तेथे या ओळी मी वाचल्या. ओळी अशा "विंचू देव्हाऱ्यापाशी आला, देवपण न ठावे त्याला, येथे पैजारांचे काय काम? अधर्माशी व्हावे अधर्म.**

याचा अर्थ असा, विंचवाचा स्वभाव डंख मारण्याचा, तो कधी कुणाला, कोठे डंख मारेल याचा नेम नसतो. अशा स्थितीत जर तो देव्हाऱ्यात किंवा देवापाशी बसला असेल तर देव देव्हाऱ्यात आहेत म्हणून त्याला पैजर म्हणजे खेटराने जरी मारले तरी तो देवाचा अवमान नसतो, उलटपक्षी एखाद्या वाईटाने त्याच्या स्वभाव धर्मानुसार वाईट कृत्य केले व तो जर देवाजवळ आश्रयास असेल तरी त्यास तेथेच ठेचले पाहिजे, अन्यथा तो परत आपणास केव्हा डंख मारेल याची शाश्वती नसते. म्हणून परिस्थितीनुरूप असे करणे नितांत गरजेचे असते. दुसऱ्या शब्दात याचे वर्णन जशास तसे वागणूक असेही करता येईल म्हणून बुद्धिवंत म्हणतात चुकीच्या गोष्टींचे समर्थन कुणीही करू नये. चूक ही चुकच असते ती जाणूनबुजून केली काय अथवा न कळत केली काय ? चूक एक दोन वेळेस केली तर त्याला दुर्लक्षून क्षमा ही करता येईल, पण जर चूक जाणून बुजून अहंकारीक भावनेने वारंवार होत असेल तर ती क्षम्य नसते. ज्या त्या चुकीनुसार त्याला शासन झालेच पाहिजे अन्यथा चूक करणाऱ्यांचा तो स्थायी स्वभावधर्म होऊन अहंकारपोटी तो कुणालाही जुमानत नाही. सबब समाजात चुकीचे संदेश जाऊन त्याची मुजोरी वाढून इतरही त्याचे अनुकरण करत असतात. चांगल्या गोष्टी पचनी पडण्यास वेळ लागतो उलटपक्षी वाईटाचे अनुकरण लवकर होऊन समाज विघातक वृत्ती बळावते. एखाद्या अनियंत्रित बेताल जनावराला त्याच्या स्वभावधर्मानुसार आवर घालून आपल्या कह्यात ठेवण्यासाठी लगाम किंवा वेसणीची गरज असते, तद्वतच कायम बेताल व बेजबाबदर वक्तव्य करून समोरच्याला किंवा समाजाला अपमानित करत असेल तर त्याकडून पुन्हापुन्हा असं बेताल वर्तन होऊ नये म्हणून अशांना कठोरात कठोर शिक्षा ही झालीच पाहिजे जेणेकरुण इतरही अशा शिक्षेला घाबरून परत - परत बेताल व अनियंत्रित वागणूक करणार नाहीत. यालाच शिक्षेची जरब म्हणता येईल. वर्तमानातील



बहुतांश राजकीय पुढारी व जनता ही कशाचीही तमा न बाळगता कुठेही व कुणाबद्दलही अशी बेताल व असंबद्ध वर्तणूक करत असल्यामुळे समा जव राजकारणात संस्कार व नितीमूल्यांचा अभाव प्रकर्षाने जाणवते. वर्तमान राजकारणात बहुतांश जण स्वतःला सुसंस्कृत व जनतेचे पुढारी म्हणून मिरवणारे नेते ही याला अपवाद नाहीत. संसद व विधिमंडळात आणि आम जनतेसमोर असे असभ्य, समाजविघातक, असंस्कृत व भान गेल्यासारखे वागणूक व आचरण कायम करत असतील तर जनतेसह दोन्ही सर्वोच्च सभागृहासाठी खूपच घातक, असभ्य आणि गलिच्छ वागणूक म्हणावी लागेल. असेच सर्व वर्तन करत असतांना जन प्रतिनिधी म्हणून मिरवणाच्या पुढाऱ्यांनी जनतेच्या मुलभूत प्रश्नावर समाज हितासाठी चर्चा करून त्याची सोडवणूक करण्या ऐवजी असभ्य व बेताल वर्तन करून जनतेच्या पैशाचा अपव्यय करण्याचा आणि लोकप्रतिनिधी म्हणून मिरावण्याचा यांना तिळमात्रही अधिकार नाही. मागच्या ८-९ महिन्यांपासून महाराष्ट्रात शिंदे - फडणवीस सरकार आल्यामुळे त्यांचे विरोधक म्हणजेच महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षाचे पुढारी वाट्टेल तशी बेताल वक्तव्य करून सारखे सारखे एक दुसऱ्याला अपमानित करून शिवराळ व अर्वाच्य भाषेत बेजबाबदारपणे वक्तव्य करून जनसामान्यात व सर्वोच्च सभागृहात आपली प्रतिमा मलिन करून जनसामान्यांपर्यंत चुकीचे संदेश पाठवत आहेत, जे समाजहितासाठी पूरक नसून उलटपक्षी आपापसासह समाजात सामाजीक तेढ पसरविण्यास्तव व सामाजिक वातावरण बिघडवण्यास पुरकच आहे. जनमताच्या आधारावर निवडून आलेले बहुतांश जनप्रतिनिधी मग ते सत्ताधारी असोत अथवा विरोधक कुठलेही भान न ठेवता सर्वोच्च सभागृहात अर्वाच्य, विसंगत किंवा असंस्कृत पणाने वागुन सभागृहाचा अवमान तर करतातच पण जनातेचाही अवमान करून सभागृह व जनतेची प्रतिमा मलिन करतात. अशा बेजबाबदार पुढारी अथवा लोकप्रतिनिधींना जनतेचा नेता तरी कसे बरे मानावे ? असे सर्वसामान्य जनतेला वाटत आहे. वर्तमान राजकारणात बहुतांश लोकप्रतिनिधी समाज व सर्वोच्च सभागृहात जर असे बेताल वर्तन करत असतील तर त्यांच्या अशा वागणुकीचा कडक कायदे व नियमाने कुठेतरी कायम बंदोबस्त झाला पाहिजे व त्यांना शिक्षाही झाली पाहिजे अन्यथा जनता ही असेच बेजबाबदार व सैराटपने वागेल. यातून कुणालाही सूट अथवा संरक्षण मिळता कामानये अन्यथा अशा चुकीच्या वागणुकीमुळे चुकीचे संदेश समाजात जाऊन परस्परात सौख्य राहणार नाही. मागच्या कैक दिवसांपासून संसद व विधिमंडळातील लोकप्रतिनिधी विशेषतः विरोधक सत्ता हाती नसल्यामुळे वैफल्यग्रस्त अवस्थेतून सत्ताधाऱ्यांवर उठसुठ गलिच्छ आरोप करून सभागृहासह जनतेची प्रतिमाही मलिन करत आहेत. विरोधक म्हणून सत्ताधाऱ्यांना जनहिताच्या प्रश्नासाठी जरूर धारेवर धरून जाब विचारावा पण कायदे व नियमांचे भान ठेवून सुसंस्कृतपणे. शेवटी आपण जनप्रतिनिधी आहोत प्रामाणिक व परदर्शीपणे वर्तन करून जनतेच्या प्रश्नाला न्याय द्यावा एवढेच जनतेला अपेक्षित असतांना विरोधक तेवढेच जनतेचे कैवारी व सत्ताधारी मात्र जनहित विरोधी अशा अविर्भावात कधीही वावरू नये. जर सत्ताधारी जनहीताला बगल देऊन भलते सलते काही करत असतील तर त्यांनाही जरूर धडा शिकविलाच पाहिजे पण कायदे व नियमांच्या चौकटीत राहूनच. असे बेताल व असंस्कृतपणे वर्तन करून नव्हे. वर्तमानात सर्वच स्तरावर बहुतांश लोकप्रतिनिधींना याची जाणीव कमी दिसते किंवा मी एक जनतेचा प्रतिनिधी या नात्याने काहीतरी जनहिताचे करून दाखवत आहे अशी स्टंटबाजी सर्वत्र चालू आहे. अगदीच सामान्य जनतेसारखे बेमालूम व बेजबाबदार राहून चालणार नाही याची जाण प्रत्येक सत्ताधारी व विरोधक लोकप्रतिनिधीना असणे व त्याची लाजही वाटणे असे जनतेला अपेक्षित आहे. जनतेला नेहेमीच अशा सुसंस्कृत, सकारात्मक व संवेदनशील विचारांच्या नेतृत्वाची अपेक्षा आहे.

आपापसात लाथाळ्या करून खालच्या स्तरावर जाऊन सभागृहाला कुस्त्यांचा आखाडा बनवू नये यातच खऱ्या अर्थाने व सर्वांगाने जनतेचे हित जोपासल्या जाईल. हा शब्दप्रपंच वाचून बहुतांशाना वाटेल असे शहाणपणाचे डोस हा व्यक्ती कशासाठी आम्हास देत आहे. मित्रहो, हा उपदेश नव्हे अथवा असे डोस आपणास देण्याइतपत मी ज्ञानीही नाही पण देश व समाज हिताला जर अशा वागणुकीमुळे चुकीचे व वाईट संदेश जात असतील तर त्याचे समर्थन समाजाने का बरे करावे ? शेवटी जनकल्याण साधण्यासाठीच लोकप्रतिनिधी असतात, बेजबाबदार, अनियंत्रित व अर्वाच्य भाषेत लोकप्रतिनिधींचे वर्तन असेल तर संबंधित कायदेशीर यंत्रणेने त्याला वेळीच आवर घालावा अन्यथा लोकप्रतिनिधी असे वागतात म्हणून जनताही अशा चुकीच्या मार्गाने जाईल जेणेकरून हितकारक तर काही साध्य होणार नाही, उलटपक्षी एकमेकांत व समाजात दुही निर्माण होऊन अराजकता पसरायला वेळ लागणार नाही. म्हणूनच " विंचू देव्हाऱ्यापाशी आला... " यानुसार अशा बेतालांना वेसण घालून नियंत्रित करावे लागेल.

**जयहिंद | लालसलाम | इन्कलाब जिंदाबाद।**



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# श्रीकृष्णभक्त ललिता गोपिकेचा पुनर्जन्म !

आधुनिक केसरी

**संतश्रेष्ठ गुरुदेव रविदासजी महाराजांना मिराबाईंनी आपले गुरू मानले होते. श्रीकृष्णभक्तीत तल्लिन झालेल्या ललिता या गोपिकेचा आपण पुनर्जन्म आहोत, असे संत मिराबाईंना वाटू लागले होते. उत्तर भारतात सर्वदूर संत मिराबाई श्रीकृष्णभक्तीचा प्रसार-प्रचार करीत त्यांची भजने गात फिरल्या. त्यांच्या पावन भक्तिमय स्मृती अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांनी या लेखातून जागविल्या आहेत.**

श्रीकृष्णभक्त संत मिराबाई उर्फ मीराबाई रत्नसिंह राठोड या राजस्थान मधील उच्चकुलीन हिंदु परीवारातील वैष्णव पंथातील एक महत्वाच्या संतकवयित्री होत. त्यांची श्रीकृष्णभक्ती एवढी प्रसिध्द आहे, की त्यांच्या इतके श्रीकृष्णावर प्रेम करणारे क्वचितच कुणी असेल. श्रीकृष्णावर निस्सीम प्रेम करण्याकरीताच त्यांचा जन्म झाला होता, असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. जवळपास १२०० ते १३०० श्रीकृष्णाला उद्देशून लिहीलेल्या रचना आजही त्यांच्या भगवद्‌भक्तिची साक्ष देतात-

**"पायो जी म्हें तो राम रतन धन पायो।**
**वस्तु अमोलक दी म्हारे सतगुरु, किरपा कर अपनायो॥**
**जनम-जनम की पूँजी पाई, जग में सभी खोवायो।**
**खरच न खूटै चोर न लूटै, दिन-दिन बढ़त सवायो॥**
**सत की नाँव खेवटिया सतगुरु, भवसागर तर आयो।**
**मीरा के प्रभु गिरिधर नागर, हरख-हरख जस पायो॥"**

राजस्थानमधील नागौर जिल्ह्यात कुडकी नामक गावात सुमारे १४९८ साली संतशिरोमणी मिराबाईंचा जन्म झाला. लहान वयातच मातृवियोगामुळे लहानग्या मीराजी या राव दुधाजी या त्यांच्या आजोबांच्या छत्रछायेखाली वाढल्या. त्यांचे वडील रतनसिंह हे मेडतिया जहागिरीचे राठोड होते. एकदा घरासमोरून जात असलेल्या लग्नाच्या वरातीकडे कुतूहलाने पहात मीराबाईंनी आपल्या आईला "माझा वर कोण ?" असे विचारले असता आई तिला देवघरात घेऊन गेली व भगवान श्रीकृष्णाच्या मुर्तीकडे बोट दाखवत "हा तुझा वर" असे सांगितले. छोट्याशा मीराबाईंवर या गोष्टीचा एवढा प्रभाव पडला, की त्यांचे जीवनच श्रीकृष्णमय झाले. अजाणत्या वयापासुनच त्या श्रीकृष्णप्रेमात बुडाल्या. त्यांना जळी, स्थळी, काष्ठी वा पाषाणीही गोवर्धन गिरीधारी भगवान श्रीकृष्ण दिसू लागले-

**"अन्न नहीं भावे नींद न आवे विरह सतावे मोय।**
**घायल ज्यूं घूमूं खड़ी रे म्हारो दर्द न जाने कोय।।**
**जो मैं ऐसा जानती रे, प्रीत कियाँ दुख होय।**
**नगर ढुंढेरौ पीटती रे, प्रीत न करियो कोय।।**
**पंथ निहारूँ डगर भुवारूँ, ऊभी मारग जोय।**
**मीरा के प्रभु कब रे मिलोगे, तुम मिलयां सुख होय।।"**

एका साधुकडून मिळालेली श्रीकृष्णमूर्ती संतकवयित्री मीराबाई सतत आपल्या जवळ ठेवत असत. त्यांनी त्या मूर्तीसमवेत स्वतःचे लग्न देखील लावले. श्रीकृष्णप्रेमात त्या इतक्या बुडाल्या होत्या, की जीवनातील सर्व गोष्टी त्यांना श्रीकृष्णापुढे नश्वर वाटत असत. चित्तोड येथील राणा संगा यांचे चिरंजीव भोजराज यांच्याशी संतश्रेष्ठ मिराबाईचा विवाह लहान वयातच करून देण्यात आला. स्वतःचा विवाह श्रीकृष्णांशी झाला असल्याने त्यांना भोजराजशी झालेला विवाह मान्य नव्हता. तरी देखील कुटुंबाच्या मानमरातब-मर्यादेकरीता त्यांनी तो स्विकारला. घरात त्या श्रीकृष्णभक्तिशिवाय आणखी इतर कोणत्याही देवतेची पूजा मान्य करीत नसत-


**"हरि तुम हरो जन की भीर।**
**द्रोपदी की लाज राखी, तुम बढायो चीर॥**
**बूडते गजराज राखे, कियो बाहर नीर।**
दासि मीरा लाल गिरिधर, दुःख जहाँ तहँ पीर॥"

सन १५२७ला झालेल्या लढाईत भोजराज मारले गेल्याने तसेच आजोबा, वडिल आणि सासरे यांचा एकामागोमाग झालेल्या मृत्यूने संत मिराबाईंनी या अशाश्वत आणि नश्वर जीवनाकडे पाठ फिरविली. आता त्यांनी श्रीकृष्णभक्तीत स्वतःला झोकून दिले होते. या दरम्यान अनेक भजने आणि रचनांची निर्मीती संत मिराबाईंकडुन झाली. विरह आणि विरक्तीने भरलेल्या त्यांच्या अनेक रचना आजही आपल्याला पहायला आणि ऐकायला मिळतात.

**"हे री मैं तो प्रेमदिवानी मेरो दरद न जाणै कोय।**
**घायल की गति घायल जाणै, जो कोई घायल होय।**
**दरद की मारी बन बन डोलूँ बैद मिल्या नहिं कोय।**
**मीरा की प्रभु पीर मिटेगी, जद बैद सांवरिया होय।।"**

सुरूवातीला संत मिराबाईंची श्रीकृष्णभक्ती ही त्यांची वैयक्तिक बाब होती; पण पुढे पुढे त्या कृष्णभक्तीत तल्लीन होत रस्त्यांवर नाचू लागल्या. ही बाब त्यांचा सावत्र दिर विक्रमादित्य याला मुळीच आवडत नसे. तो चित्तोडचा त्यावेळी नव्यानेच राजा झाला होता. त्याने संत मिराबाईंना संपविण्याचे अनेक प्रयत्न केले. प्रसादात विष कालवले, फुलांमधे साप पाठविला, बिछान्यावर खिळे रोवले... परंतु प्रत्येक संकटातून श्रीकृष्णकृपेने त्या सहीसलामत सुटून वाचत राहिल्या. विषप्रयोग केलेल्या दुधाचा नैवैद्य ज्यावेळी त्यांनी श्रीकृष्णाला दाखवला आणि प्रसाद म्हणून ते दूध ग्रहण केले, त्यावेळी श्रीकृष्णाची मूर्ती विषामुळे हिरवी झाली. परंतु संत मिराबाईंना काहीही बाधा झाली नाही. हे पाहून त्यांना खुप वाईट वाटले. त्यांनी भगवान श्रीकृष्णाला पूर्ववत होण्यास प्रार्थना केली. भगवान पूर्ववत मूर्ती रूपात प्रकट झाले. त्यांचा प्रसिद्ध भजन-

**"पग घूँघरू बाँध मीरा नाची रे!**
**मैं तो मेरे नारायण की आपहि हो गई दासी रे!!**
**लोग कहै मीरा भई बावरी न्यात कहै कुलनासी रे!**
**विष का प्याला राणाजी भेज्या पीवत मीरा हाँसी रे!!**
**मीरा के प्रभु गिरिधर नागर सहज मिले अविनासी रे!!"**



संतश्रेष्ठ गुरुदेव रविदासजी महाराजांना मिराबाईंनी आपले गुरू मानले होते. श्रीकृष्णभक्तीत तल्लिन झालेल्या ललिता या गोपिकेचा आपण पुनर्जन्म आहोत, असे संत मिराबाईंना वाटू लागले होते. उत्तर भारतात सर्वदूर संत मिराबाई श्रीकृष्णभक्तीचा प्रसार-प्रचार करीत त्यांची भजने गात फिरल्या. इ.स.१५३८च्या सुमारास त्या वृंदावनात आल्या असाव्यात, असा अनेक अभ्यासकांचा अंदाज आहे. आपल्या आयुष्यातील शेवटच्या वर्षांत त्या द्वारका येथे वास्तव्यास होत्या. येथेच श्रीकृष्णाच्या चरणी त्या कायमच्या लीन झाल्या. गोवर्धन गिरिधारी गोपाळ श्रीकृष्णाच्या मूर्तीत त्या दि.२ मार्च १५६८ रोजी लुप्त झाल्या, असे सुद्धा अनेक इतिहास अभ्यासक सांगतात.



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

# आला होळीचा सण लय भारी

आधुनिक केसरी

**होळी हा रंगाचा सण आहे अगदी लहान मुलांपासून तर वयस्करांपर्यंत सर्व जणांनी एकत्र येऊन आनंदाने साजरा करण्याचा हा सण आहे.रंगाची उधळण तर असतेच, पण मनातील राग होळीच्या दिवशी आरोळ्या मारुन,ग्रामीण भागात त्याला बोंबा मारून राग व्यक्त करणे म्हणतात. एखाद्याच्या नावाने शिमगा करण्याची प्रथाही या सणात आहे. त्या दिवशी अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करून एक गमतीदार भाग म्हणून स्वीकारला जातो. तरीपण अशाप्रकारे आरोळ्या मारतांना त्या कृतीने आजूबाजूला तणाव निर्माण होईल अशी कृती मात्र व्हायला नको हे बंधन प्रत्येकाने पाळायला हवे.**

होळीच्या दिवशी आपण बऱ्याच वेळा वर्तमानपत्रात राजकीय सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांची होली है बुरा न मानो असे म्हणून त्याच्या बोलण्याची किंवा एखाद्या सवयीची मस्करी केली जाते परंतु त्या दिवशी ते माफ असते शक्य तर कोणी मनावर घेतच नाही.
आपल्याकडे नवीन वर्षाची सुरुवात गुढीपाडव्याला होते, मग रामनवमी, अक्षय तृतिया, गणपती, दुर्गाउत्सव -नवरात्र ( दसरा ), दिवाळी ( वसुबारस, पाडवा, धनत्रयोदशी,लक्ष्मी पूजन,भाऊबिज. ) आणि शेवटचा सण तो होळी चा सण असतो. यावर्षी सहा मार्च तारखेला होळी आणि सात तारखेला धुलीवंदन आहे. फाल्गुन पौर्णिमेला आपण "होळी" सण साजरा करत असतो. त्यालाच हुताशनी पौर्णिमा असेही म्हणतात.होळीचा उत्सव,"होलिकोत्स्वव" म्हणतात. आपल्याकडे होळीला शिमगा असेही म्हणता तसेच होरी हा शब्द सुध्दा प्रचलित आहे.
वसंत ऋतूचे आगम झालेलेअसते.वातारणात,नैसर्गिक बदल झालाअसतो.थंडी संपून, उन तापायला सुरूवात झाली असते.उन्हाळ्याची चाहुल लागते.पानगळ सुरु झाली असते.पळसाचे फुले आली असतात. पूर्वीच्या काळी होळीच्या वेळी रंग ओढण्यासाठी पळसाच्या फुलाचा वापर केला जात असे फुलाचा रंग काढून तो लावला जात असे आयुर्वेदातही पळसाच्या फुलाचे महत्त्व आहे. आंघोळीच्या पाण्यात पळसाचे फुले टाकून आंघोळ केल्यास त्वचारोग नाहीसा होतो असे म्हटले आहे. उत्तर भारत, दक्षिण भारत,महाराष्ट्रात होळीचा सण हा वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. महाराष्ट्रातील खानदेश विदर्भ कोकण या ठिकाणी सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने होळी साजरी करतात.
कोकणात होळीचा सण जवळपास पंधरा दिवस साजरा केला जातो तर इतर ठिकाणी होळी पौर्णिमा धुलीवंदन म्हणजेच धुळवड नंतर रंगपंचमी शिमगा असा हा सण वेगळ्या पद्धतीने साजरा होतो. आपल्याकडे आता होळी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी धुलीवंदन म्हणजे धुळवड असते पण त्याच दिवशी युवा मंडळी धुळवड आणि रंगपंचमी साजरी करतात डीजे लावून होळीचे गाणे लावून नाचतात एकमेकाला रंग लावतात संपूर्ण रंगाने अंग भिजवून घेतात की चेहरे ओळखू येत नाही अशा प्रकारे आनंद व्यक्त करतात.
उत्तर भारतात पुतना राक्षिणीला जाळतात.
तर दक्षिणेस कामदेवाचे दहन करतात.
कोकणात होळीचा उत्सव मोठा असतो. विशेष रत्नागिरी जिल्ह्यात जास्त.तसेच मालवण. तिकडे शिमगो असेही म्हणतात. कोकणात हा सण 5 ते 15 दिवस असतो होळीचा हा मुख्य दिवस असतो . ग्रामदेवतेच्या मुख्य मंदिरासमोर पहिला होम लावण्याचा मान असतो, व त्यातील निखारा घेऊन मग गावातील ठिकठिकाणी होळी पेटवली जाते.
होळी पौर्णिमा, धुळवड, आणि रंगपंचमी असा हा सण साजरा केला जातो. होळी हा रंगांचा सण समजला जातो. तसेच एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी केली जाते. तसेच पारंपारिक नृत्य पारंपारिक गाणे यामध्ये साजरे केले जातात वंजारी समाजात होळीला फार महत्त्व आहे. पारंपारिक पोषाख घालून नृत्य करण्याची प्रथा आहे. म.प्र.त इंदोर, वरती मथूरा, वृंदावन, नंदगाव,ला होळी
विशेष साजरी होते. मथुरा आणि वृंदावन येथील होळी व तिथला उत्साह अवर्णनीय असतो, मथुरा येथील फुलांची होळी ही जग प्रसिद्ध आहे. यासाठी गुलाब, कमळ, चंपा, चमेली, यासारखे फुलांची होळी साजरी केली जाते. प्रत्येक ठिकाणच्या आख्यायिका वेगवेगळ्या सांगितल्या जातात. महाराष्ट्रात भक्त प्रल्हादाची गोष्ट सांगितली जाते.हिरण्यकश्यपू हे भक्त प्रल्हादाचे वडिल.ते त्याचा फारच छळ करायचे. प्रल्हादाने विष्णुचे/नारायणाचे नाव घेऊ नाही म्हणून त्याला उंच कड्यावरुन लोटले, उकळत्या तेलाच्या कढईत टाकले, पण त्याला काहीही झाले नाही.
म्हणून बहिण हुंडा/होलीका जिला अग्निचे भय नसते. तिला वर लाभला असतो, तिच्या मांडीवर अग्नित प्रल्हादाला बसविले जाते,पण प्रल्हादाला काहीच होत नाही.पण हुंडा जळून जाते. अशी कथा आहे. अर्थातच वाईट गोष्टींचा नाश व्हावा, दुर्गुणाचा नाश व्हावा हीच त्यामागील भावना आहे. पूर्वीच्या काळी गावातील प्रमुख चौकात नगारखान्यात होळी पेटवली जात होती. आताही गावातील प्रमुख चौका बरोबरीने, निरनिराळ्या कॉंलन्यातून होळी पेटवली जाते.एका खड्यात एरंडाची उंच फांदी रोउन आजूबाजूला शेणाच्या



गोवऱ्या रचतात. लाकूड, झाडाच्या वाळलेल्या फांद्या रचतात.हार घालतात.मुख्य होळी पेटवली की तिथून मशाल पेटवून इतर होळी पेटवितात.असा प्रघात आहे. होळी पेटवलेल्यावर होळीच्या दर्शनासाठी गर्दी होते. स्त्रिया पूजा करतात. पुरण पोळीचा नैवेद्य दाखतात. पुरूषमंडळी नारळ अर्पण करतात. खोबऱ्याची वाटी होळीच्या निखाऱ्यावर भाजून तो प्रसाद वाटतात. सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. होळीला घरोघरी पुरणपोळी,कटाची आमटी,हे समीकरण ठरले असते. एकमेकांशी वैर,राग असेल तो होळीत टाकून संबंध सुधारावेत ही भावना असते. होळी सण साजरा करत असताना वृक्षतोड होणार नाही याची दक्षता घ्यावी वृक्षतोड केल्यास दंडात्मक करावे होऊ शकते याचे भान ठेवावे तसेच त्याच्या गल्लीतील लोक स्वच्छने देतील तेवढे गौऱ्या आणि लाकूड होळी जाण्यासाठी घ्यायला हवे उगीच त्यासाठी वादावादी करू नये. सगळ्यांनी एकत्र येऊन साजरा करण्याचा हा संघ असल्यामुळे अशा गोष्टी घडायला नको जेणेकरून बंधू भावाने व आनंदाने साजरा होईल.
होळीच्या दुसरे दिवशी धुलीवंदन-धुळवड साजरा करतात. तर पाचव्या दिवशी "रंगपंचमी " साजरी करतात.सर्वत्र भेदभाव-भांडणे-वैर-विसरुन रंगाची उधळण करतात. पावरा लोकात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा होतो. बंजारी समाजातही होळी उत्साहाने साजरी होते. रंगांची उधळण करत असताना तो रंग अपायकारक नसावा, तसेच कोणालाही इच्छा विरूद्ध रंगवू नये. पाणी भरलेल्या फुग्यांचा वापर करू नये शक्यतोवर गुलाल उधळून आनंद व्यक्त करावा पूर्वीच्या काळी पळसाच्या फुलांचा रंग काढून त्याचा वापर केला जायचा आणि त्यामुळे कुठली हानी होत नव्हती. मद्य प्राशन करू नये. या सर्व गोष्टीचे भान ठेवणे महत्त्वाचे आहे.मोठ्या प्रमाणावर भांगही घेत असतात. होळीचाच भाग रंगपंचमी ला रंग उधळला जातो.राग मानायचा नसतो.म्हणूनच "बुरा ना मानो होली है"!! म्हणतात. अनेक ठिकाणी रंग बरसे... भिगी चुनरिया..,रंग बरसे.. होली.. रे होली..रंगोकी होली...,अशा गाण्यावर धुंद होऊन नाच केला जातो. आनंदोत्सव साजरा करतात. होलिका ही वाईट प्रवृत्तीची असल्यामुळे तिचा अंतही वाईट पद्धतीनेच झाला. त्यामुळेच वाईट आचार विचारांना बाजूला सारणे संपवणे, मनातील वाईट विचार होळी प्रमाणे अग्नीत जाळून राख करणे, हाच होळी साजरा करणे या मागचा उद्देश आहे. याच दिवशी वाईट विचारांचा व वाईट गोष्टींचा त्याग केला पाहिजे.आज आपण बघतोय एकमेकां विषयी वाईट भावना किती टोकाला पोहचल्या आहेत.एकमेकांच्या विषयी चांगल्या भावना नाही, पदोपदी दुष्मनी आढळते, ती नष्ट होणे आजच्या काळात प्रामुख्याने गरज आहे हे सांगायला नकोच. आपल्या देशात पूर्वीच्या काळी आपल्या देशात सर्व सणवार बंधूभावानी आणि आनंदाने साजरी केली जात होते.आणि त्या सणांचा आनंद घेतला होता. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे प्रत्येकाने वेगवेगळ्या प्रकारे आपल्या पद्धतीने सणवार साजरे करायचे ठरवले असे दिसते. राजकीय स्वरूप आले आहे. दहीहंडी गणेशोत्सव दुर्गा उत्सव यावेळी आपणाला असे वेगळेपण जाणवते.
किमान अशा सणवाराचे प्रसंगी तरी सगळे राग रुसवे बाजूला ठेवून एकत्र यायला हवे.आनंद घ्यायला हवा.

**होली के दिन दिल खिल जाते है..**
**रंगो मे रंग मिल जाते है..**
**गीले शिकवे भूल के दोस्तों..**
**दुष्मन भी गले लग जाते है..**



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

# आणि ती वाट दुरात धावते तेव्हा...

आधुनिक केसरी

**एकट्या एककल्ली वाटेला चालता चालता, का कोण जाणे पानांची ती सळसळ खुणावते काही नकळे नकळता, बेहोश बेधुंद दुरात धावणारी ती पायवाट, हळव्या किनारीची तिथे एक डगरवाट. ऐकू येतो सुर निरागस दूर पानातून,प्रतिध्वनी तो घुमतो खोल त्या दरीतून. गिरी राजाच्या कडेला आलेली लाली रवी राजाच्या संधी कालात बुडून लुप्त होऊ पहात होती. निशेची काळी शाल अन् उगवतीच्या दारातून येणाऱ्या रजनिशच्या शितलतेची किनार त्यावर हळूवार उमटू पहात होती. सगळे कसे आल्हाद दायक सुखकारक पण कुठेतरी काहीतरी कमी जाणवत होती.**

घरट्यात विसावलेल्या पक्षी अन् पिलां चा तो मंद चिवचिवाट.. माय प्रेमाचा वर्षाव करतेय ची जाणीव झाली. आपली मायबोली मराठी.... ? उगाच हातून नकळत काहीतरी निसटून चालले का.. ? जन्मतः मिळालेले आणि आपले हक्काचे असे एक वैभव ते म्हणजे माता मायदेश आणि मातृभाषा जे आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. मायबोली आमची मराठी आहे आम्हाला तिचा अभिमान. माझ्या मराठीविषयी मी काय बोलणार,किंवा काय लिहणार. यापेक्षा एक विचार डोक्यात डोकवून गेला. माझ्या मराठी भाषेविषयी मी काय करणार किंवा काय करू शकणार...

२७ फेब्रुवारी कुसुमाग्रजांचा जन्मदिवस जो मराठी राजभाषा दीन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळावा म्हणून अथक परिश्रम घेतले. एवढेच म्हणेन की ज्यांनी मराठी भाषेसाठी एवढे परिश्रम घेतले . त्यांचा हा वारसा पुढे चालवण्यासाठी आपणच प्रयत्न करायला हवाय.

ज्या मराठीचा अभिमान व्यक्त करताना आपले ज्ञानेश्वर माऊली बोलतात...

**माझा मऱ्हाठा चि बोलू कौतुके**
**परी अमृतेतही पैजा जिंके!**
**ऐसि अक्षरे रसिक |मेळविन||**

असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान आणि मराठीची महती किती सुंदर शब्दात व्यक्त केली आहे. खरे सांगायचे तर या वाक्याचा मनापासून अर्थ जेव्हा कळला. म्हणजे निबंध लिहताना कित्येक वेळा ही वाक्ये लिहली वाचली ,तेव्हा लक्षात नाही आले.पण अनेकदा वाचले तेव्हा लक्षात आले. किती सुंदर शब्दात मराठीची महती माउलींनी व्यक्त केली आहे.अमृतलाही पैजेने जिंकणारी अक्षरे अशी अमृतवाणी च ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दा शब्दातून प्रकट झाली आहे.आणि ब्रम्हविद्या च शब्दरूप झाली. आहे.यापेक्षा माझ्या मराठीचे कौतुक ते काय! अशी ती आमची मायबोली खरचं शब्दांनाही कोडं पडावं ..

असे म्हणतात की पहिली काव्यरचना ज्ञानेश्वरानी केली असे मानले जाते.तसे तर ९व्या शतकापासूनच सुरुवात झाली असे,वाचनात आले होते.असो! परंतु ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने मराठी भाषेचे माधुर्य प्रकांड पंडिताना आणि जनसामान्याना ही चाखायला मिळाले.या अमृततुल्य भाषेचा ओघ संत तुकाराम, एकनाथ, विष्णू शास्त्री चिपळूकर यांसारख्या अनेक दिग्गज मंडळीनी अजून अशी अनेक नावे आहेत. ज्यांनी आपली वाड़मयरुपी गंगा त्यात सोडून मायबोलीचा विस्तार आणखी विस्तिर्ण केला. अभंगगाथा ,भागवत केकावली यासारखे वाड़मय तीर्थक्षेत्रच जणू निर्माण करुन माणसामाणसात मराठी रुजविली शिवाजी महाराजांनी ही आपला राज्य कारभार मराठीतूनच चालवला. आपल्या मायबोलीला एक विशिष्ठ दर्जा महान व्यक्तिमत्वानी दिला. पण तो आपण टिकवून ठेवायला हवाय. इंग्रजांच्या काळातही इंग्रजांच्या आक्रमनाबरोबर इंग्रजी भाषा आणि इंग्रजी संस्कृतीचेआक्रमन मराठी माणसांवर आणि पर्यायाने आपल्या मराठी भाषेवरही झाले. त्यातूनही आपल्या मायबोलीचे तेज टिकून राहिले. मराठी भाषेवर इंग्रजीचे आक्रमन झाले, तरीही तिचे तेज नष्ट नाही झाले. कारण मराठी भाषा अशी आहे की ती एखाद्या विशाल समुद्राप्रमाने ती आपल्यात सर्व काही सामावून घेउ शकते. त्यावेळेलाही विष्णूशास्त्री चिपळूणकरांसारख्या दिग्गजांनी अप्रतिम वाड़मय निर्मिती करुन मायबोलीचे संरक्षण केले. इंग्लडमध्ये अध्ययनासाठी गेलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या महात्म्यानी तर मातृभाषेविषयीचा अभिमान कधीही सोडला नाही.मराठी भाषेच्या शुद्धीकरणाची चळवळ त्यानी सुरु ठेवली.

**परभाषिय शब्दाना त्यानी मराठी प्रतिशब्द दिले.**
**आणि मराठीचे अस्सल मराठीपण राखले.**
**कितीतरी संत कवी लेखक विचारवंतानी**
**मराठीपण राखून मराठीचा मान उंचावला.**

स्वातंत्र्योत्तर काळात प्रांतरचना झाली.महाराष्टाची निर्मिती झाली. मराठी भाषेला वैभवाचे दिवस येतील,अशी आशा निर्माण झाली. पण ते एक दिवास्वप्नच राहिले. अर्थात याला आपण मराठी माणसेंच जबाबदार आहोत. असे मला वाटते.त्यावेळेलाही मराठीतून शिकण्याऐवजी इंग्रजी माध्यमातून शिकण्याचा लोकांचा कल वाढला.आणि त्याच्यामुळेच की काय आपल्या मराठीचा दर्जा खालावला असावा. अमृतलाही पैजेने जिंकणारी अक्षरे आज... ?

त्याच मराठीची आजची स्थिती पाहिली की खूप वाईट वाटते.जरा कुठे आश्चर्य झाले...ohh ! my God जरा कुठे चुकले कि oh! shut काय आहे हो हे ?नव्हे नव्हे काय आहे हे ? एवढेच नव्हे हो रस्त्यावरुन चालताना ठेच लागली तर आई गं ? च्या ऐवजी आत्ता ohh!The heal असे शब्द जेव्हा कानावर पडतात.तेव्हा एखाद्या दयनीय असा चेहरा समोर येतो. नि मग वाटते.
अहो 'आई गं ' या शब्दाचं सामर्थ्य अन् जी ऊर्जा मिळणार. ती ऊर्जा या ohh!The heal मधून मिळणार का हो ?
ohh!The heal मधून खरं सांगा ! आई गं या शब्दातून जी ऊर्जा आपल्याला मिळते, ( तेव्हा आपली आई आपल्यासोबत असल्याची जाणीव होते. आपल्यासोबत आहे असे वाटते.किंवा ती आपल्याला



सावरते आहे असे च वाटते, म्हणजे मला तरी वाटते. मराठी भाषेचेसुद्धा मला असेच वाटते.आज तिला आपणच सावरायला हवे. आहे. मराठीचे संवर्धन आपण मराठी माणसांनीच करायला हवेय.आपल्या पुढच्या पिढिला त्यातून ऊर्जा मिळेल.आणि आपल्या मराठीचा ऱ्हास होणार नाही. मराठी चा र्‌हास नाही होणार, साऱ्या जगात ती टिकून राहणार ,उद्या आपल्याच बांधवांना तारणार, तिला टिकवण्याची आस आम्ही धरणार. दिवस उगवल्यापासून आपण किती तरी इंग्रजी शब्दांचा वापर करतो 'Good morning', 'Good night,' 'breakfast', 'lunch','dinner',' mother' 'father',' brother',' sister' असे कितीतरी शब्द आज अभिमानास्पद वाटतात. वाटू लागले आहेत. उच्च ग्रुप वाटू लागले आहेत. त्याच्याही पुढे जाऊन आता पप्पांचा paps किंवा *Daddy झाला. Mummy ची आता Mom झाली. brother चा bro झाला. sister चि sis झाली. एवढेच नव्हे हो आणखी कितीतरी शब्द अगदी वाक्या वाक्यातून एखादा दुसरा शब्द इंग्रजी असतो.ठीक आहे , आपल्याला दुसऱ्या भाषेचा अवमान करायचा नाहीच.संपर्काने किंवा सहवासाने असे होऊच शकते. ठीक आहे, होऊ द्या त्यामुळे दुसऱ्या ज्ञानात भर पडते आहे. पण त्याच बरोबर आपण काय करावे हे तर आपल्या हातात आहे ना! हे करताना आपण आपल्या मुळ उद्देशापासून बाजूला नाही जायचे. आपली मराठीही इथे तेवढ्याच ताकदीने कशी टिकून राहील. यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे . म्हणजे हे माझे मत आहे. माझ्या समोरची काही उदाहरणे आहेत.मुलाला सहज मराठी दिनविशेष भाषण देत असताना सहज त्याला म्हटल आपण मम्मी ऐवजी आई,पप्पा ऐवजी बाबा म्हटले सिसला ताई ब्रो ला दादा म्हटले तर आपण एक नवी सुरुवात तर करुया.एक दोनदा मराठी शब्द आले. आणि थोड्या वेळाने सवयीप्रमाणे नेहमीचे शब्द...मग मी म्हटले आरे ...की लगेच..ओके.. ओके.. अरे तर लगेच मला म्हणतो but मी try तर करतोय. पण एक गोष्ट समाधान कारक होती. म्हणजे मी मराठी भाषेविषयी संभाषण देवून सहा वर्षाचा मुलगा वाचता येत नसल्यामुळे साहजिकच पाठांतर करून घेत होते.पण पाठांतरा नंतर आपोआपच मी न सांगता ही तो आई आणि मराठीतील शब्दांच्या उच्चारा चा प्रयत्न करू लागला.म्हणजे लहान मुलांवर संस्कार होताना कसे होतात.याची जाणीव झाली.असे वाटले प्रयत्न केला तर सहज शक्य होऊ शकेल. मुद्दे काढत असताना, एक गोष्ट लक्षात आली, राजभाषा दिन साजरा करतो ,त्यात मराठी कविता निबंध आणि आणखी बरेच काही असते.त्याच्यात एक गोष्ट म्हणण्यापेक्षा आपण म्हणजे आपण प्रत्येक मराठी माणसाने तरी प्रत्येकाने त्यादिवशी शक्य तितके मराठी बोलायचे. म्हणजे मम्मी ऐवजी आई ,पप्पा ऐवजी बाबा असा प्रयत्न करायला काय हरकत आहे. म्हणजे त्यातून आपली मराठी टिकवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. असे माझे मत आहे. इंग्रजी ही जागतिक स्तरावरची ज्ञानभाषा आहे.आजच्या जागतिकीकरणाच्या काळात आपल्याला टिकून राहण्यासाठी इंग्रजी भाषा शिकावी तर लागणारच आहे.पण त्याच्या सोबत आपण मराठी माणसांनी आपल्या मराठी भाषेविषयी प्रयत्न शील असले पाहिजे असे मला वाटते. हरवत चाललेल्या माझ्या मायबोलीला शोधून पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न जरुर करणारआणि मराठीचा वारसा आम्ही जपणार. आपल्या मायबोलीच्या शब्द संपत्ती चा ऱ्हास होत चालला आहे. अमृतापेक्षा ही गोड समजली जाणारी आपली मराठी भाषेची आज आपण पहायला गेलो तर अवघड परिस्थिती झाली आहे. **क्रमशः**

# 'रोग हाल्याला, इंजेक्शन पखालीला'

## अजित पवार यांची सरकारवर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एसटीच्या मोडक्या, तुटक्या व भंगार बसवर राज्यशासनाच्या जाहिराती प्रसिद्ध केल्याप्रकरणी भूम एसटी आगाराच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची कारवाई म्हणजे 'रोग हाल्याला, इंजेक्शन पखालीला...' असा प्रकार असल्याची जोरदार टीका करत विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी संबंधित कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्याची मागणी केली. दरम्यान राज्य शासनाने जाहिरातींवर पैसे उधळण्यापेक्षा तो पैसा एसटीच्या दुरुस्ती, देखभाल व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी वापरावा, अशी मागणीही अजित पवार यांनी सभागृहात केली.

विधानसभेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून एसटी कर्मचाऱ्यांच्या निलंबनाला विरोध करताना अजित पवार यांनी राज्यपालांच्या अभिभाषण प्रस्तावावर बोलताना, मुख्यमंत्र्यांचा फोटो असलेली राज्य शासनाची जाहीरात, भंगार, तुटक्या, फुटक्या, एसटी बसवर लावण्यात आल्याचे छायाचित्र दाखवले होते. राज्य शासनाकडून सुरु असलेली जाहीरातींवरची उधळपट्टी कमी व्हावी आणि तो निधी एसटीच्या सुधारणांसाठी, कर्मचाऱ्यांच्या हितासाठी, खर्च व्हावा, अशी अपेक्षा होती. परंतु तसे काही घडले नाही याबाबत अजित पवार यांनी खंत व्यक्त केली.

या जाहिरातीनंतर भंगार एसटीची सुधारणा करण्याऐवजी उलट, सरकारने, आपला दोष लपवण्यासाठी, भूम एसटी आगाराचे, वाहन



परीक्षक डी. बी. एडके, एस. एन. हराळ, ए. यु. शेख या तिघांना निलंबित केले. खिडक्या नसणारी एसटी बस फेरीसाठी बाहेर काढण्यास कारणीभूत असल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवला. आणखी काही जणांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचे कळतेय. सरकारचा हा निर्णय म्हणजे, 'रोग हाल्याला, इंजेक्शन पखालीला...' असल्याचे अजित पवार म्हणाले. राज्यात, फक्त एकाच एसटी बसची दुरवस्था झालेली नाही. अशा हजारो नादुरुस्त, मोडक्या, तुटक्या बस रस्त्यावर धावत आहेत. त्या चालवणाऱ्या सगळ्याच कर्मचाऱ्यांना तुम्ही निलंबित करणार का, असा संतप्त सवालही अजित पवार यांनी सरकारला विचारतानाच अशा पद्धतीने सर्वच कर्मचाऱ्यांना निलंबित करावे लागेल आणि एकही एसटी बस रस्त्यावर धावू शकणार नाही. त्यातून ग्रामीण जनतेची गैरसोयच होणार आहे, असे अजित पवार म्हणाले. या प्रकरणात निलंबित एसटी कर्मचाऱ्यांचा काही दोष नाही. त्यांचे निलंबन तातडीने मागे घेण्यात यावे. त्याप्रमाणेच, इतरांवर सुरु करण्यात आलेली कारवाईही थांबवावी. कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्याऐवजी, सरकारने, एसटीच्या ताफ्यात असलेल्या बसगाड्यांच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करावे. देखभालीवर लक्ष द्यावे. मुख्यमंत्र्यांनी जाहिरातबाजीला आळा घालावा. जाहिरातींवरचा कोट्यवधीचा खर्च टाळून, एसटीचे आधुनिकीकरण, विकासकामांसाठी तो निधी वापरावा, अशी मागणीही अजित पवार यांनी केली. कारवाई करायचीच असेल तर, ज्यांनी शासनात बसून जाहिरातीचे टेंडर काढले. ज्यांनी मोडक्या एसटीवर जाहीरात दिली. मोडक्या एसटीवर जाहिरात दिल्याचे लक्षात येऊनही, पैशांचा अपव्यय होऊ दिला, त्यांच्यावर कारवाई करावी. एसटी महामंडळ आणि एसटीची प्रवासी सेवा, हा महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहास आहे. ग्रामीण, दुर्गम भागात आजही एसटी हीच प्रवासाचे साधन आहे. एसटीचा वापर राजकारणासाठी न करता, महाराष्ट्राच्या विकासासाठी झाला पाहिजे, अशी अपेक्षाही विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी व्यक्त केली.

# डी- मार्टमध्ये अश्लिल कृत्य करणारा ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील डीमार्ट येथे एक व्यक्ति स्वताचे गुप्तांग दाखवुन अश्लिल कृत्य करतांनाचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता . सदर इसमाचा शोध घेवून त्याचेवर कारवाई करण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक संजय बारकुंड साहेब यांनी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील , स्थागुशा धुळे यांना आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने सदर इसमाचा शोध घेत असता, पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, स्थागुशा धुळे यांना सदर इसमाचे नाव मनोज रावण महाले, वय ३४ व्यवसाय खाजगी नोकरी रा. शांती नगर, रेल्वे स्टेशन मागे, धुळे असे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली व हेमंत पाटील, स्थागुशा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने इसम नाम मनोज रावण महाले यास दिनांक




०२/०३/२०२३ रोजी ताब्यात घेतले असून पुढील कारवाईकामी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात हजर केले आहे . सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक किशोर काळे , अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, स्थागुशा धुळे, विनोद पाठक, योगेश साळवे, योगेश ठाकुर, जगदीश सुर्यवंशी, देवेंद्र ठाकुर अशांनी सदरची कारवाई केलेली आहे.

# उपाध्यक्षपदी नंदकिशोर पवार यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष काशिनाथ पाटील जाधव



यांनी संभाजीनगर जिल्हा, फुलंब्री व कन्नड तालुकानिहाय कार्यकारणी जाहीर केली आहे. कार्यकारणीत औरंगाबाद जिल्हा उपाध्यक्षपदी नंदकिशोर पवार, औरंगाबाद जिल्हा कोषाध्यक्षपदी देवराव आहेर, जिल्हा सचिवपदी संतोषराव शेळके, औरंगाबाद जिल्हा सहसचिव पदी शामराव भोकरे, फुलंब्री तालुका अध्यक्षपदी साईनाथ बेडके, फुलंब्री तालुका उपाध्यक्षपदी शिवाजीराव वाहटुळे, फुलंब्री तालुका कोषाध्यक्षपदी सुरेश जाधव, कन्नड तालुका अध्यक्षपदी गोपीनाथराव आदिक, सेवानिवृत्त कन्नड तालुका उपाध्यक्षपदी कल्याणराव मोतींगे अशी नियुक्ती झाली. वानेगाव शाखा स्थापन करण्यात आली. अध्यक्ष रामराव सोनवणे, उपाध्यक्ष बाबूराव पाटील जाधव यांची निवड करण्यात आली.

# विद्यापीठ अभ्यास मंडळावर प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांची अध्यक्ष म्हणून निवड

## निवडणुकीच्या माध्यमातून पार पडली निवड प्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या



वाणिज्य शाखेच्या अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष पदासाठीची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेतील एकूण 5 मंडळांपैकी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या 'अकाउंट्स अँड अप्लाइड स्टॅटेस्टिक' या अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार हे निवडून आले आहेत. डॉ.राजाराम पवार हे गेल्या 34 वर्षांपासून लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात कार्यरत आहेत. या कालावधीत त्यांनी वाणिज्य शाखेचे विभाग प्रमुख, उपप्राचार्य म्हणून काम पाहिले आहे, तर सध्या ते याच महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. डॉ.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत एकूण 7 विद्यार्थ्यांनी पीएचडी पूर्ण केली असून, सध्या त्यांच्याकडे 6 विद्यार्थी पीएचडी करीत आहेत. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पार पडलेल्या विविध परिषदांमध्ये सहभाग नोंदवला आहे. नांदेड विद्यापीठाच्या या महत्त्वाच्या अभ्यास मंडळावर निवड झाल्याबद्दल डॉ.राजाराम पवार यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, कुलगुरू डॉ.उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांच्यासह दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



# मोरेश्वर विद्यालयात दहावीची परीक्षा सुरळीत

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च -२०२३मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेला नुकताच प्रारंभ झाला असून राजूर येथील मोरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील परीक्षा केंद्रावर दहावीच्या परीक्षेला सुरळीत सुरुवात झाली आहे.ही परीक्षा 2 मार्च ते 25 मार्च दरम्यान होणार आहे.परीक्षा केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. मराठीच्या पहिल्या पेपरला अधिकाऱ्यांनी केंद्राला भेट देऊन परीक्षा संदर्भातील माहिती जाणून घेतली. त्यामुळे परीक्षार्थींवर भरारी पथकाची कडक नजर असल्याचे दिसून आले. या परीक्षा केंद्रावर एकूण 577 विद्यार्थी परीक्षा देत असून प्रत्येक खोलीत 25 विद्यार्थी याप्रमाणे एकूण 21 दालनात परीक्षार्थींची आसनव्यवस्था करण्यात आली आहे. केंद्रावर मोरेश्वर विद्यालय,मोरेश्वर इंग्लिश स्कूल, विनायक विद्यालय, गणपत दादा इंग्लिश स्कुल, ऋषी महाराज विद्यालय अशी पाच विद्यालयातील विद्यार्थी परीक्षा देत आहेत. दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेला सामोरे जाताना तणावमुक्त वातावरणात परीक्षा व्हाव्यात म्हणून परीक्षा केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.परीक्षेचे स्वरूप, पेपर सोडवण्याचा कालावधी,बारकोड स्टिकर ,आसन क्रमांक, स्वाक्षरी व पुरवणी या संदर्भात परीक्षार्थींना माहिती देण्यात आली. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षा केंद्राने कठोर अंमलबजावणी केली आहे. परीक्षार्थींना तशा सूचनाही दिल्या आहेत. संबंधित परीक्षा अधिकारी,कर्मचारी आणि विद्यार्थ्यांकडून बोर्डाच्या निर्देशांचे पालन होत असल्याचे केंद्रास भेट दिलेल्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. परीक्षेदरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून स्थानिक तसेच भरारी पथकांची नजर परीक्षार्थींवर असणार आहे. खबरदारी म्हणून पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

एकंदरीत दहावीची परीक्षा सुरळीतपणे चालू असल्याचे समजते.परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी केंद्रप्रमुख संतोष सोनूने, संतोष इंगळे, भगवान रगड, सुनील दानवे यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.



# स्पर्धेच्या माध्यमातून पंढरपुरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत: परिचारक

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या औचित्य साधून, पंढरपूर येथे अखिल भारतीय ( निमंत्रित ) शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन मा.आ.प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा ( ग्रामीण ) पोलीस अधीक्षक ,श्री शिरीष सरदेशपांडे होते. याप्रसंगी बोलताना श्री प्रशांतराव परिचारक यांनी अखिल भारतीय स्तरावरील शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल पंढरपूर व्हॉलीबॉल संघातील सर्व सदस्यांचे कौतुक केले. अजिंक्य क्रीडा मंडळाच्या माध्यमातून पंढरपुरात विविध क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन दिले जात आहे. मंडळाच्या माध्यमातून जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याद्वारे पंढरपुरातील स्थानिक खेळाडूंना उत्तम खेळाडूंचा,कौशल्यपूर्ण खेळ पाहण्यास मिळावा व नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळावी हा उद्देश असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. अध्यक्ष व सोलापूरचे पोलीस अधीक्षक श्री शिरीष सरदेशपांडे साहेब यांनी पंढरपुरातील सर्व नागरिकांना व्हॉलीबॉल स्पर्धा बघण्यासाठी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले. या स्पर्धेसाठी आवर्जून उपस्थित असलेले ऑल इंडिया शूटिंग व्हॉलीबॉल फेडरेशनचे सचिव श्री रविंद्रजी तोमर यांनी पंढरपूरच्या पवित्र भूमीत या राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करून प्रेक्षकांना आनंद द्यावा असे आवाहन केले. याप्रसंगी क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल संतोष पाटील सर ,चेतन धनवडे सर, प्रा. सुभाष मस्के सर, व राष्ट्रीय खेळाडू प्रीती काळे, अमृता माने ,शिवानी यड्रावकर यांचा सत्कार करण्यात आला.राष्ट्रीय स्तरावर व्हॉलीबॉल खेळामध्ये उत्तुंग कामगिरी केल्याबद्दल भारतीय व्हॉलीबॉल संघाचे उपकर्णधार जयंत खंडागळे यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे सर,संचालक लक्ष्मणतात्या धनवडे,जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव माने सर, मा.नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट,वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर अरुण फुगे साहेब, मा. नगरसेवक गणेश अधटराव, मा.नगरसेवक विक्रम शिरसट, अर्बन बँकेचे संचालक मनोज सुरवसे,महाराष्ट्र शूटिंग व्हॉलीबॉल फेडरेशनचे सचिव विष्णू निकम, कार्याध्यक्ष राजेंद्र नांद्रेकर. सदाशिवराव माने व राजेंद्र मोहिते तसेच आंतरराष्ट्रीय पंच जावेद मनोरे, अरविंद पाटील, सुरेश पाटील, रफिक मोहम्मद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक सुभाष मस्के यांनी केले.

# प्लास्टिक बंदीसाठी पालिकेने कंबर कसली

## पाच रुपयाच्या वस्तूलाही मात्र प्लास्टिक पिशवीसाठी ग्राहकांचा आग्रह

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** पर्यावरण रक्षणासाठी शासनाने प्लास्टिक बंदीचा निर्णय घेण्यात आला आणि त्याची अंमलबजावणी जोरात सुरू करण्यात आली. परंतु पाच रुपयाच्या वस्तूलाही मात्र प्लास्टिक पिशवीसाठी ग्राहकांचा आग्रह होत असल्याने प्लास्टिक वापरणारे व्यापारी व व्यावसायिक यांची 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी अवस्था होत असल्याचे बोलले जात आहे. कोरोनानंतर घायकुतीला आलेले अनेक लहान व किरकोळ व्यवसायिक यांना प्लास्टिक बंदीचा फटका सहन करावा लागत आहे.



सांगोला शहरात प्लास्टिक वापराविरोधात गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात बंदी असलेली प्लास्टिक जप्ती व दंडात्मक कारवाई नगरपालिकेकडून सुरू केली आहे. या कारवाईचे पर्यावरणप्रेमी नागरिकांमधून स्वागत होत आहे. नगरपालिकेच्या या कारवाईचा धसका व्यापारी व व्यावसायिक वर्गाने घेतला आहे. रविवारी आठवडा बाजरात ही मोठी कारवाई नगरपालिकेच्या वतीने करण्यात आली. यामुळे ग्रामीण भागातील व्यापारी व व्यवसायिकांमधून मात्र ' आमच्याकडे नाही असली प्लास्टिक बंदी' अशी चर्चा होत होती. पर्यावरणाला घातक असणाऱ्या पिशव्या बेशिस्त पण इतरत्र कोठेही फेकून दिल्या जातात, त्यामुळे अनेकवेळा मोकाट जनावरांना व पर्यावरणहानी होत आहे.त्याचबरोबर वापरानंतर फेकण्यात आलेला प्लास्टिकचा कचरा गटारी व नाल्यात अडथळा निर्माण करत. विशेष करून पावसाळ्यात प्लास्टिकच्या पिशव्या व कागदामुळे गटारीत आणि नाल्यात कचरा अडकल्याने आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

वास्तविक पाहता नागरिकांनी प्लास्टिकच्या दुष्परिणामाचा आणि पर्यावरणाचा विचार करून स्वतःहून प्लास्टिक पिशव्यांचा वापर पाळणे गरजेचे आहे. प्रशासनाकडून घेण्यात आलेल्या प्लास्टिक बंदीचा निर्णय निर्णयाच्या अंमलबजावणीची सुरुवात नागरिकांनी स्वतःपासूनच करणे गरजेचे आहे. अत्यावश्यक गरजेच्या वेळीचं वापर करून,जास्तीत जास्त कागदी, कापडी आणि पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करणे गरजेचे आहे. वास्तविक पाहता प्लास्टिक वापर टाळण्यासाठी नागरिकांनामध्ये प्रबोधन आणि जनजागृती होणे गरजेचे आहे.




# आ. फारुख शाह यांचे विकासाच्या दिशेने आणखी एक पाऊल..!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील प्रमुख मुख्य वर्दळीचा रस्ता असलेला पंचवटी व शहरातील बाजारपेठ असलेल्या रस्त्याचे काम सुमारे २० वर्षापासून झालेले नव्हते या रस्त्यांवर जिल्ह्यातील लोकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते हा रस्ता खराब झाल्यामुळे अनेक नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत होता याबाबत धुळे शहरातील व्यापारी संघटनांनी आमदार फारुख शाह यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली होती की पंचवटी झेरॉक्स पासून ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत रस्ता व्हावा.याबाबत आमदार फारुख शाह यांनी याची तत्काळ दखल घेत मागच्या वर्षी या रस्त्याबाबत पाठपुरावा केला होता. त्याला यश येवून महाराष्ट्र शासनाने या रस्त्यासाठी १ कोटी ७० लक्ष रुपये मंजुर केले आहे.

धुळे शहराचा विकास करतांना आमदार फारुख शाह यांच्या दूरदर्शीपणामुळे सगळ्या घटकांना बरोबर घेवून शहराच्या प्रमुख रस्ते जसे जळगाव चौफुली ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत तसेच संतोषी माता ते गुरुद्वारापर्यंत, हॉटेल कृष्णाईपासून ते नेहरू पुतळ्यापर्यंत शहरातील प्रमुख महामार्गांचे रस्त्यांचे करोडो रुपयाचे काम आमदार फारुख शाह यांनी आजपर्यंत केलेले आहे. सर्व समाजाला समान न्याय या पद्धतीने शहर विकासाचे काम चालू असून विरोधकांनी विकासाच्या कामासाठी किती विरोध केला तरी शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणण्याचे काम आमदार फारुख शाह करीत त्याचाच एक भाग म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे अर्थसंकल्पीय कामे अंतर्गत पंचवटी झेरॉक्स ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंतच्या १ कोटी ७० लक्ष रुपयाचे कामाचे उद्घाटन आमदार फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळेस आ.फारुख शाह यांचे सोबत नगरसेवक गनी डॉलर, माजीनगरसेवक गुलाब माळी, तालुका तालीम संघाचे अध्यक्ष रवींद्र आघाव, नगरसेवक नासिर पठाण, प्रा.मोहन मोरे, कैसर अहमद, जमील खाटीक, इकबाल शाह,फकिरा बागवान, शाहिद शाह, उपअभियंता धर्मेंद्र झाल्टे, कनिष्ठ अभियंता राहुल पाटील, नझर खान, रिझवान पठाण, बबलू शेखआदी उपस्थित होते.

# मनसे नेता संदीप देशपांडेंवर शिवाजी पार्कमध्ये हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांच्यावर शुक्रवारी सकाळी शिवाजी पार्क परिसरात मॉर्निंग वॉकसाठी गेले असताना हल्ला झाला. या हल्ल्यात संदीप देशपांडे यांच्या हात आणि पायाला दुखापत झाली आहे. संदीप देशपांडे यांच्यावर सध्या हिंदुजा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. डॉक्टरांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले आहेत. त्यांना मारहाणीत गंभीर दुखापत झाली आहे का, हे तपासण्यासाठी त्यांचा एक्स-रे काढण्यात आला आहे. सध्या संदीप देशपांडे यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र, देशपांडे यांच्यावरील हल्ल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. यानंतर संदीप देशपांडे यांना भेटण्यासाठी मनसेचे नेते आणि कार्यकर्त्यांनी हिंदुजा रुग्णालयात मोठी गर्दी केली. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि अमित ठाकरे हे दोघेही काहीवेळापूर्वीच हिंदुजा रुग्णालयात पोहोचले आहेत. मनसेचे नेते नितीन सरदेसाई आणि अन्य कार्यकर्ते सकाळपासूनच याठिकाणी आहेत. तर भाजप आमदार नितेश राणे हेदेखील हिंदुजा रुग्णालयात पोहोचले आहेत. संदीप देशपांडे यांच्यावरील हल्ल्यानंतर राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. देशपांडे यांच्यावरील हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, गेल्या काही दिवसांपासून संदीप देशपांडे सातत्याने मुंबई महानगरपालिकेतील घोटाळ्यांबद्दल बोलत आहेत. याच कारणामुळे त्यांच्यावर हल्ला झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे शिवतीर्थ निवासस्थानही शिवाजी पार्क परिसरात आहे. संदीप देशपांडे हेदेखील शिवाजी पार्कमध्येच वास्तव्याला आहेत. आज सकाळी ते नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकला पार्कात आले होते. त्यावेळी याठिकाणी दबा धरून बसलेल्या टोळक्याने स्टम्पच्या साहाय्याने त्यांच्यावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी संदीप देशपांडे यांच्यावर मागून हल्ला केला.

# वडोदवाडी येथे जंगी शंकरपट

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद खु. वाडी येथे ब्रह्मलीन संत श्री पुर्णगिरीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य जंगी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले असून शनिवार रोजी या पटाचे उद्घाटन संपन्न झाले. या उद्घाटन प्रसंगी सरपंच पाकीजा साबेर पठाण, उपसरपंच गोपाल वाघ, गोविंद पांडेजी, वडोद बाजार पोलीस स्टेशनचे पीएसआय संभाजी खाडे, सरपंच जगन दाढे ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग मंदाडे,सामाजिक कार्यकर्ते प्रविण एखंडे ,अमोल भैया तुपे, यांची प्रमुख उपस्थिती होती. पुर्णगिरीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य जंगी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले असून दि. २५ व २६ फेब्रुवारी या दोन दिवसी हा पट भरणार आहे. यात अनेक मोठ मोठी व वेगवेगळ्या गटात बक्षिसांची खैरात करण्यात आली आहे. या जंगी शंकर पटाचे अध्यक्ष आप्पा तायडे, उपाध्यक्ष दसरू मंदाडे, व गावकऱ्यांनी आयोजन यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहे. यावेळी डॉक्टर रवि जाधव, डॉक्टर राम आहेर, ग्रामपंचायत सदस्य सुहास वायकोस ग्रामपंचायत सदस्य राजीक शेख, ग्रामपंचायत सदस्य शुभम गंगावणे,कडूबा मस्के, अशोक शिंगारे, साबीर पठाण,आळंद उपसरपंच रामेश्वर चोपडे, उमाजी खाकरे,पांडुरंग ब्राह्मणे, बबन मंदाडे, सर्जेराव गाडेकर, काकाजी कोलते, आदिनाथ दुधे, अरुण वायकर, आसाराम कोलते,राहुल खाकरे,साईनाथ बेडके, शंकर तुपे, ऋषभ पांडेजी, काकाजी वाघ,आजिनाथ वाघ,साहेबराव खाकरे, शिवाजी खाकरे, पांडुरंग तायडे, आर्मी अशोक खाकरे, बाळू जाधव,नामदेव गाडेकर,सतीश वाघ, नवनाथ दुधे, तुळशीराम गाडेकर,किरण पवार, राजू खाकरे, गजानन गाडेकर,गावकरी उपस्थित होते. व ग्रामपंचायत कर्मचारी कृष्णा सहाने, मनोज वाघ,संजू मंदाडे, बाळू वाघ, सद्दाम शेख, गणेश धनके, शकील शेख,उपस्थित होते. तालुक्यातील वडोदवाडी येथे घेण्यात आलेल्या दोन दिवसिया शंकर पटात ११५ बैलजोड्यांनी सहभाग घेतला होता हि स्पर्धा राजूर येथील शिवा-भारत या बैल जोडीने तीनशे फुटाचे अंतर केवळ ५ सेकंदात गाठून पहिले बक्षीस पटकावले. वडोदवाडी येथे शनिवार व रविवार या दोन दिवस शंकर पाटाचे आयोजन करण्यात आले होते यात पहिल्या दिवशी गावगाडा मधील ४५ बैल जोडीने सहभाग घेतला होता तर दुसऱ्या दिवशी छत्रचती संभाजीनगर, बुलढाणा, जालना या जिल्ह्यातील ७० बैल जोड्या नि भाग घेतला यामध्ये शंकर पाटाचा थरार दिसून आला.

राजूर येथील उमेश भोपळे यांच्या शिवा व भारत या बैअल्व्य जोडीनी तीनशे फुटाचे अंतर केवळ ५ शेकंद ८३ मिली या वेळात पूर्ण करून ३१ हजार रुपयाचे पहिले बक्षीस पटकावले तर दुसरे बक्षीस खडकवाडी येथील पृथ्वीराज राजपूत यांच्या लाडक्या व बादल या बैलजोडीने २१ हजाराचे बक्षीस मिळविले . या शंकर पट करिता आत्माराम तायडे, सुभाष मंदाडे, सरपंच पाकिजा पठान, उपसरपंच गोपाल वाघ, शिवाजी खाकरे, उमाजी खाकरे, सोमीनाथ खाकरे, सांडू दुधे, सुनील मंदाडे, बाबुराव जाधव, रवींद्र गाडेकर सह ग्रामपंचायतच्या सदस्यांनी पुढाकार घेतला होता .



# पहूर येथे यात्रोत्सवात भाविकांची मोठी गर्दी



आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भव्य यात्रोत्सवाचे दि.२/३/२३ रोजीआयोजन करण्यात आले. पहूर शेंदुर्णी मार्गावर पहूर पासून दोन किलोमीटर अंतरावर श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर असून येथे भाविकांची मोठी गर्दी असते . गेल्या १७ वर्षांपासून येथे मंदिराचे पुजारी व ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांच्या अथक परिश्रमातून भाविकांच्या अमूल्य सहकार्याने शिव महापुराण व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यंदा प्रथमच यात्रेला व्यापक स्वरूप देण्यात आले. महाशिवरात्री निमित्त छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलातर्फे ध्वज स्तंभलोकार्पण करण्यात आले . हेमंत जोशी यांच्या हस्ते वेदमंत्रोच्यारात ध्वज पूजन करण्यात आले.

शिवभक्त रंगनाथ महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बजरंग दलाचे भैय्या कुमावत, मयूर धनगर, ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, ईश्वर हिवाळे, सुरेश चौधरी यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह महाशिवरात्रीच्या शुभ-पर्वावर भव्य यात्रोत्सव आयोजित करण्यात आला. खेळणी, प्रसाद, पुजापत्री यासह विविध व्यावसायिकांनी आपले स्टॉल्स लावले होते. पहूर सह पंचक्रोशीतून भाविक मोठ्या संख्येने शिवदर्शनासाठी आले होते सकाळपासूनच भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या वतीने स्वागत करण्यात आले .यात्रोत्सवासाठी ग्रामपंचायत पहूर कसबे , पहूर पेठ , पोलीस प्रशासनाचे सहकार्य लाभले .

# 63 वर्षानंतर खांडी पिंपळगाव येथील सोसायटी बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज


**खुलताबाद :** खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथील रा.सो.का. सहकारी सोसायटी स्थापना दिनांक 31/ 12/ 1959 रोजी स्थापना झाली असून तब्बल 63 वर्षा नंतर सर्व गावकऱ्यांनी एकत्र बैठक घेऊन सर्व समाजाचे प्रतिनिधी आपापल्या परीने दिले असून 'न भूतो न भविष्य'असा एक इतिहास रचला म्हणून आज सर्व उमेदवाराने सर्व गावकऱ्यांचे शब्दसुमनाने स्वागत केले. जनरल जागेसाठी निवडून आलेले उमेदवाराचे नाव, महेश पाटील उबाळे, निसार उस्मान सय्यद, अशोक बळवंत महालकर, रावसाहेब नामदेव महालकर, अण्णा उत्तम श्रीखंडे, केदार सांडू कोकणे, चरण गजराव सिंग राठोड, विलास



भोपाल सिंग झाला, तर ओबीसी महिला, कल्पनाबाई ज्ञानेश्वर महालकर, राखीव महिला भीमाबाई रामनाथ श्रीखंडे, कमलबाई कारभारी श्रीखंडे, एस सी राखीव, नामदेव शहाजी भालेराव, एनटी राखीव, प्रेमसिंग कचरू जोनवाळ, या 13 जनावर गावकऱ्यांनी विश्वास ठेवून तब्बल 63 वर्षानंतर बिनविरोध निवड करण्यात आली गावामध्ये व इतर तालुक्यामधून खांडी पिंपळगावकर यांना व उमेदवारांना शुभेच्छेचा वर्षाव होत आहे. यावेळी सरपंच सज्जनसिगं राजपूत व सर्व ग्रामपंचायतचे सदस्य, अशोक उबाळे, मिठू महालकर, रशीद सय्यद, कारभारी महालकर, मच्छिंद्र उबाळे, गंगाधर कोकणे, भाऊसाहेब श्रीखंडे, दत्तू श्रीखंडे, संतोष महालकर, मच्छिंद्र महालकर, तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल जोनवाळ, पोलीस पाटील जनार्दन उबाळे, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद, आरपीआय तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव, व गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला मंडळ तरुण मंडळ पुरुष मंडळ या सर्वांनी सर्व निवडून आलेल्या उमेदवाराचे शब्दसुमनाने अभिनंदन केले.

# आठ मार्च रोजी रविंद्रमध्ये महिला लोककला संमेलन

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** भारत सरकारची संगीत अकादमी ही सांस्कृतिक श्रेत्रातील सर्वोच्च संस्था आणि महाराष्ट्र शासनाची पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त बुधवार दि.आठ मार्च रोजी रविंद्र नाट्य मंदिर प्रभादेवी येथे अखिल भारतीय महिला लोककला संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सध्या G20 प्रमाणेच W20 गटाचे नेतृत्व करीत असून संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा या W20 महिला गटाच्या अध्यक्षा आहेत. त्यांच्या संकल्पनेतून साकार होणाऱ्या या संमेलनात भारतातील काही राज्यातील महिला लोकप्रिय लोककला सादर करणार आहेत. आठ मार्च ला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते सकाळी 10 वाजता अ.भा.महिला लोककला संमेलनाचे उद्‌घाटन योजिले आहे. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, मराठी भाषा व शालेय शिक्षण तथा मुंबईचे पालक मंत्री दीपक केसरकर आणि पर्यटन तथा महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभाग प्रधान सचिव व मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव विकास खर्गे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा असतील. या अ.भा. महिला लोककला संमेलनाचे सूत्र आदिरंग, भक्तीरंग, लोकरंग असे असून पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे तारपा नृत्य , गोदावरी मुंडे यांचे भजन, चंदाबाई तिवाडी यांचे भारूड, छत्तीसगडच्या संप्रिया पूजा निषाद यांचे पंडवानी गायन, सांगलीच्या कल्पना माळी यांचा पोवाडा, कर्नाटक मधील ढोलूकुनिथा, राजस्थानातील शामला याचे कलबेलिया नृत्य प्रमिला लोदगेकर याचे लावणी नृत्य, झेबा बानो याचे कव्वाली गायन होणार आहे. भारतीय संत कवयित्रींचे योगदान आणि रूपेरी पडद्यावरील लोककला असे दोन परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत.डॉ. रविंद्र बेंबरेकर, डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ. राजश्री शिर्के डॉ. रंजना हरिश, डॉ.विरल शुक्ला, राजदत्त. प्रा.डॉ.प्रकाश खांडगे, प्रा. डॉ.गणेश चंदनशिवे ,सोनिया परचुरे. सुभाष नकाशे आदी मान्यवर परिसंवादात सहभागी होणार आहेत. सकाळपासून रात्री 9 पर्यंत सुरू असणारे सर्व कार्यक्रम सर्वासाठी खुले असतील त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन पु.ल.देशपांडे अकादमीचे प्रकल्प संचालक संतोष रोकडे आणि संगीत नाटक अकादमी तर्फे हेलन आचार्य यांनी केले आहे.

# चिंचोली लिंबाजी येथे वंचितचे आंदोलन



आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** शेतकऱ्यांच्या कापसाचा भाव कमी व घरगुती गॅस सिलिंडरचे भाव वाढीविरुद्ध वंचिततर्फे केंद्र सरकार व राज्य सरकारचा कपाळाला हात मारून रड बोंबल करून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.
वंचिततर्फे दोन्ही सरकार केंद्र सरकार व राज्य यांच्या जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. खत बिजवाईचे भाव वाढत असताना सगळी कडे महागाई प्रमाणात वाढत असताना..सरकारने शेतकर्यांने पिकवलेल्या कापसाचे भाव कमी करत आहेत. शेतकऱ्यांना दहा ते बारा हजार रूपये भावाच्या आशेने शेतकऱ्यांनी कापुस घरात साठवुन ठेवला असता... कापसाचे भाव न वाढता कमी होत आहे. सरकारने दिलेला शंभर रूपयात गॅस सिलेंडरची किंमत वाढत आहे. जर कापसाचा भाव नाही वाढला तर येणाऱ्या काळात शेतकर्यांचे आत्महत्याचे प्रमाण वाढत जाईल...याला कारणीभुत दोन्ही सरकार केंद्र सरकार व जास्त जबाबदार राईल... या शेतकऱ्यांच्या समस्याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वंचित तर्फे कपाळाला हात मारून रड बोंबल करून केंद्र सरकार व राज्य सरकारचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी वंचित कार्यकर्ते तातेराव भुजंग, सर्कल प्रमुख भागवत चौतमोल, वंचित जेष्ठ नेते गणेश अंभोरे, सुरेश भारुडे, अमृत चौघुले व ईतर ग्रामस्थ या ठिकाणी उपस्थित होते.

# कासेगाव सरपंचपदी रिजवान भालदार

आधुनिक केसरी न्यूज



**कासेगाव :** येथील परिचारक गटाचे विद्यमान सरपंच सुनंदा भुसे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त पदावरती निवडणूक लागली होती या निवडणुकीमध्ये ग्रामपंचायत सदस्य रिजवान भालदार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. विरोधात आमदार समाधान आवताडे, प्रशांत परिचारक, भालके गटाकडून सुमन लिंगे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने दोघांमधील लढतीत परिचारक गटाच्या रिजवान भालदार यांना 17 पैकी 11मताने यांचा बहुमताने निवड करण्यात आली.यावेळी निवडणूक निर्णायक अधिकारी मोरे यांनी निवडीचे अध्यक्ष उपसरपंच संग्रामसिंह देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली रिजवान भालदार यांची सरपंच पदी निवड जाहीर केली निवडी नंतर कार्यकर्त्यांनी हालगीच्या कडकडाटासह फटाक्यांची आतिषबाजी केली आणि सगळा परिसरात दनाणुन गेला होता तसेच कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करुन आपला आनंद उत्सव साजरा केला.

# खासदार टाईम्सचे संपादक खान एजाज अहमद यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दैनिक सत्य नीती च्या वतीने खासदार टाईम्स चे संपादक तथा सीएमबीसी चे संचालक खान एजाज अहमद यांचा वाढदिवस सुभेदारी गेस्ट हाऊस येथे बुधवारी एक मार्च रोजी साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक बुलंद शक्तीचे संपादक रामेश्वर दरेकर, बहुजन हिताय चे संपादक बबनराव सोनवणे, दैनिक शब्दमतचे संपादक आजमत पठाण उपस्थित होते या प्रमुख अतिथींच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन खान यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन दैनिक सत्य नीती चे संपादक देविदास कोळेकर, उपसंपादक जगन्नाथ सुपेकर यांनी केले होते. या कार्यक्रमास दैनिक आधुनिक केसरी चे व्यवस्थापक संजय व्यापारी, लोकप्रश्न चे उपसंपादक राज ठाकरे, साप्ताहिक उज्वल महाराष्ट्र चे संपादक हसन शहा, साप्ताहिक युद्ध भूमीचे संपादक फिरोज शेख पत्रकार शाकेर खिस्ती, गोरखनाथ जैस्वाल, सह आदि पत्रकार उपस्थित होते. तसेच पुणे येथील ललित कोब्रा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अँड. विवेक भाई चव्हाण यांनीही एजाज खान यांना प्रत्यक्ष भेटून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच हैद्राबाद येथील अँक्टीव न्युज चैनल चे प्रतिनिधी मौजम अन्वर यांनी एजाज खान यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सत्कारमुर्ती खान एजाज अहमद आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, या समाजातील विविध घटकांचा विकास व्हावा ही संकल्पना यशस्वी ठरवण्यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन आम्ही करत असतो असे खान म्हणाले. शहराच्या विविध ठिकाणी खान यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

# विरोधीपक्षनेते दानवे यांच्या कार्यकर्त्यांविरोधात खंडणीचा गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांच्या कार्यकर्त्यावर बांधकाम व्यावसायिकाला दीड कोटी रु. खंडणी मागितल्या प्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात गुरुवारी दुपारी ४वा. गुन्हा दाखल झाला आहे. २००६ सालचे हे प्रकरण आहे या गुन्ह्यात अंबादास म्हस्के, रा. मिटमिटा व इतर १० १२ जण खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी आहेत . चारच महिन्यापूर्वी आरोपी म्हस्के यांनी आ, संजय शिरसाठ यांच्या सांगण्यावरून शिंदेसेनेत प्रवेश केला होता पण विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी दोन दिवसातच म्हस्के यांना स्वगृही बोलावून घेतले.

या प्रकरणात म्हस्के यांच्या सोबत शोभा प्रधान,जनाबाई पादर, चंद्रकला जाधव, नंदू म्हस्के, खंडू म्हस्के इलियास पटेल , किशन कणसे या कार्यकर्त्यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. २००६साली बांधकाम व्यावसायिक नसीर रशीद पठाण (४४) रा. बायजीपुरा यांनी इतर सहकाऱ्यासोबत मिटमिटा येथील २ एकर ६१ गुंठे भूखंड खरेदी होता. त्यावर सुरक्षा रक्षकही ठेवला होता.

गेल्या जानेवारी २३ मध्ये विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे समर्थक अंबादास म्हस्के यांनी आपल्या अनेक कार्यकर्त्यासह पठाण यांनी खरेदी केलेल्या भूखंडावर कब्जा करंतअधिकार सांगितला १९९० साली हा भूखंड अंबादास म्हस्के यांच्या वडिलांच्या नावावर होता. तो त्यांनी विक्री केला होता. नंतर पठाण यांनी खरेदी केला अशी माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे तरीही नसीर पठाण यांनी हे प्रकरण सामंजस्याने सोडवण्याचा प्रयत्न केला पण त्यांना यश न आल्यामुळे इतर भागीदारांच्या सल्याने त्यांनी गुन्हेशाखेकडे तक्रार दिली या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक कैलास देशमाने करत आहेत.

# 'सेवा भवन' प्रकल्पाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते उद्या उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रा. स्व. संघ जनकल्याण समितीतर्फे सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सेवा भवन या सेवा प्रकल्पाचे उद्‌घाटन शनिवारी, ४ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते होणार आहे. कोथरूडमधील गांधी लॉन येथे हा कार्यक्रम होणार आहे. कोथरूड-पटवर्धनबाग परिसरात हा सेवा प्रकल्प साकारला असून रा. स्व. संघ जनकल्याण समिती, जनकल्याण सेवा फाऊंडेशन आणि डॉ. हेडगेवार स्मारक सेवा निधी या तीन संस्थांनी मिळून 'सेवा भवन'ची निर्मिती केली आहे. ही वास्तू सात मजली असून एकूण बांधकाम २७ हजार चौरसफुटांचे आहे.
'सेवा भवन' या प्रकल्पामध्ये एका मजल्यावर अत्यल्प शुल्कातील डायलेसिस सेंटर चालवले जाणार आहे. अन्य तीन मजल्यांवर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी अत्यल्प शुल्कातील उत्तम निवास व्यवस्था तसेच भोजन व्यवस्था उपलब्ध होणार आहे. एका मजल्यावर रुग्ण आणि नातेवाईकांसाठी मार्गदर्शन तसेच माहिती केंद्र असणार आहे. इमारतीच्या तळमजल्यावर 'जनकल्याण समिती'तर्फे कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण केंद्र चालवले जाणार आहे. 'जनकल्याण समिती'च्या तसेच महाराष्ट्रातील अन्य सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी येथे अद्ययावत सभागृह तयार करण्यात आले आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in